103 शतकोत्तर वाटचाल

एकमेव स्वतंत्र दैनिक
# नवाकाळ
NAVAKAL

• मुंबई, शुक्रवार ६ मार्च, २०२६ • वर्ष-१०३, अंक-३६०, पाने-८, किंमत: ₹ ७

• R.N.I.No.1814/57 • Vol.- 103, Issue - 360 Marathi - Daily - Mumbai, 6 March, 2026 Page- 8 Price- Rs. 7/-

• संपादक- रोहित रमाकांत पांडे | 24x7 : www.navakal.in | Email- contact@navakal.in



नवाकाळच्या Digital बातम्या पाहण्यासाठी Scan करा!

शरद पवारांची गरज की हट्ट ?

navakal.in

@navakal.news Navakal Digital Network @_NDN_Offical @NavakalNews


# विकासेतर खर्चात वाढ! 'लाडकी बहीण' संख्या घटली
## कृषी, उद्योग अडचणीत! सेवा क्षेत्रावर सर्व भार

■ मुंबई

**महाराष्ट्र आर्थिक पाहणी अहवाल आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सादर केला. यानुसार राज्याची महसुली जमा ५,६०,९६४ कोटी अपेक्षित असून, महसुली खर्च मात्र ६,०६,८५५ कोटी इतका अपेक्षित आहे. राजकोषीय तूट उत्पन्नाच्या तीन टक्क्यांच्या मर्यादित ठेवण्याचा प्रयत्न केला असल्याचा दावा करीत असताना तूट ही २.९ टक्के असल्याचे म्हटले आहे. महसुली जमा ८०.२ टक्के तर महसुली खर्च ८६.७ टक्के आहे. विकासेतर महसुली खर्च हा १,६२,१०६ कोटीवरून २,०२,१३६ कोटी रुपयांवर गेला आहे. राज्यावरील कर्जातही ११.१ टक्के वाढ अपेक्षित आहे.**

**राज्याच्या** 'लाडकी बहीण' योजनेवर सर्वांचे लक्ष असून, या अहवालात म्हटले आहे की, २०२४-२५ मध्ये या योजनेचे २.४७ कोटी लाभार्थी होत्या. त्यावर ३२,४७० कोटी रुपये खर्च झाला. आता लाभार्थ्यांची संख्या कमी होऊन २.३८ कोटी झाली असून, खर्चही कमी होऊन २९,५७० कोटी रुपयांवर आला आहे.

**अवकाळी, पुराची मदत**

अवकाळी पाऊस व गारपिटीमुळे झालेल्या नुकसानीपोटी चार लाख शेतकऱ्यांना ३३७.४२ कोटी रुपये भरपाई देण्यात आली. अतिवृष्टी व पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना ९०२२.३८ कोटींची भरपाई मंजूर करण्यात आली.

**महाराष्ट्र वृद्ध होऊ लागला**

राज्यात १५ वर्षांखालील मुलामुलींची संख्या २६.७ टक्क्यांवरून १९.६ टक्के इतकी कमी होणार आहे. मात्र ६० वर्षांवरील वृद्धांची संख्या १० टक्क्यांवरून १३.१ टक्के इतकी वाढणार आहे.

**'शिवभोजन थाळी' कमी झाली**

गरीब जनतेसाठी २०२० साली राज्य शासनाने शिवभोजन थाळी सुरू केली. २०२५ अखेर १८७४ शिवभोजन केंद्र होती. २०२४-२५ मध्ये ६.३३ थाळींचे वाटप झाले. त्यावर २११.७० कोटी खर्च केले. २०२५-२६ नोव्हेंबर अखेरपर्यंत मात्र हे वाटप कमी होऊन ४.०९ कोटीच थाळींचे वाटप होऊन त्यावर फक्त ५६.२३ कोटींचा खर्च झाला.

**आरोग्य व शिक्षणाची आबाळ**

प्राथमिक व माध्यमिक शाळा आणि विद्यार्थी संख्येत लक्षणीय घट झाली आहे. आरोग्याची स्थितीही वाईट असून, एक लाख लोकसंख्येमागे केवळ ७३.३४ खाटा आहेत. ही गणनाही २०२३ सालची असून, त्यानंतर गणना केलेली नाही. महाराष्ट्रात जन्मदर कमी झाला आहे. नवीन कुटुंब मुलांना जन्म देण्यास उत्सुक नसल्याचा हा परिणाम असावा. जन्मदर कमी झाला असताना मृत्यूदर मात्र वाढला आहे. धक्कादायक बाब म्हणजे शासकीय रुग्णालये व दवाखान्यांच्या संख्येत मोठी घट झाली आहे.

**सेवा क्षेत्राचाच आधार**


राज्याची अर्थव्यवस्था ७.९ टक्क्यांनी वाढणार असल्याची अपेक्षा आहे. मात्र ही वाढ सेवा क्षेत्रावर अवलंबून आहे. सेवा क्षेत्राची ९ टक्के वाढ अपेक्षित आहे तर उद्योग क्षेत्रात केवळ ३.४ टक्के आणि कृषी क्षेत्रात फक्त ५.७ टक्के वाढ अपेक्षित आहे.

**रस्त्यांचे जाळे**

वर्सोवा-वांद्रे सागरी सेतू प्रकल्प २०२८ पर्यंत पूर्ण होणार असून, त्यावर ४८१९.६४ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. मुंबई-पुणे महामार्ग विस्तारावर ७५६०.४४ कोटींचा खर्च, पुणे चक्राकार वळण रस्ता ११,१४१.४८ कोटी खर्च (२०२८ पर्यंत), विरार अलिबाग मार्ग ३,४७९.१६ कोटी रुपये खर्च अपेक्षित असून, तो २०२८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे.

**मुंबई-अहमदाबाद हायस्पीड रेल्वे**

राज्यात १५६ किमी लांबीचा मुंबई अहमदाबाद हायस्पीड रेल्वेची एकूण लांबी ५०८ किमी आहे. यावर १.०८ लाख कोटी खर्च होणार असून, आतापर्यंत ३५ टक्के काम पूर्ण झाले आहे.




### दरडोई उत्पन्न वाढले

महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न ३ लाख ४७ हजार ९०३ रुपये असून, ते देशाच्या सरासरी दरडोई उत्पन्नापेक्षा (२ लाख १९ हजार ५७५ रुपये) सुमारे दीड पटीने जास्त आहे. राज्याचा स्टार्ट अपचा हिस्सा देशात सर्वाधिक १७ टक्के आहे. थेट परकीय गुंतवणूक ३१ टक्क्यांसह देशात सर्वाधिक आहे. राज्यात ११.३६ कोटी इंटरनेट ग्राहक आहेत, तर मोबाईलधारकांची संख्या १२.७८ कोटी आहे. नोंदणीकृत वाहनांची संख्या ५.२८ कोटी आहे. प्रति किमी ही संख्या १५३ इतकी आहे.


धौती-योग®
चूर्ण व टॅबलेट्स
पोट साफ न होणे, बद्धकोष्ठ, गॅसेस, ॲसिडिटी, मूळव्याध इ. विकारांवर प्रभावी !
आजच रात्री घ्या, सकाळी OK!
डॉ. अभिजीत 9422011723


# भारत अंतिम सामन्यात
## संजू सॅमसन पुन्हा चमकला
## इंग्लंडचा ७ धावांनी पराभव



**मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर आज झालेल्या टी-२० विश्वचषकाच्या अटीतटीच्या उपांत्य सामन्यात भारताने इंग्लंडला ७ धावांनी पराभूत करून या स्पर्धेच्या अंतिम सामन्यात धडक मारली. भारतीय संघाने इंग्लंडला विजयासाठी २५३ धावांचे भलेमोठे लक्ष्य दिले होते. मात्र या धावसंख्येचा पाठलाग करताना जेकब बेथेलने (४८ चेंडूंत १०५ धावा) भारतीय गोलंदाजांची जोरदार धुलाई करून हा सामना यशस्वीरित्या शेवटपर्यंत नेला. अखेरच्या षटकात तो धावचित झाल्यामुळे इंग्लंडला निर्धारित षटकांत ७ बाद २४६ धावापर्यंत मजल मारता आली. परिणामी उपांत्य सामन्यात इंग्लंड संघाचा विश्वचषकाचा प्रवास थांबला. ४२ चेंडूंत ८९ धावा करणारा संजू सॅमसन सलामीवीर ठरला.**

■ मुंबई

**इंग्लंडने** नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला. मात्र दुसऱ्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर सलामीवीर अभिषेक शर्मा षटकार मारण्याच्या नादात ९ धावांवर झेलबाद झाला. फिरकीपटू विल जॅक्सने त्याचा बळी घेतला. त्यानंतर सलामीवीर संजू सॅमसन आणि ईशान किशन यांनी चौकार आणि षटकार ठोकून इंग्लंडच्या गोलंदाजांची » पान ४ वर

# बिहारच्या राजकारणात नितीशकुमार यांचा अस्त
## राज्यसभेत जाणार! बिहारमध्ये भाजपाचा मुख्यमंत्री

■ पटणा

**बिहारचे** मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी आज राज्यसभेसाठी अर्ज भरल्यानंतर बिहारच्या राजकारणातील एका युगाचा अस्त होत आहे. अवघ्या १०५ दिवसांपूर्वी दहाव्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतलेले नितीशकुमार यांनी बिहारची सत्ता सोडण्याचा निर्णय घेतल्याने राज्यात राजकीय बदलाचा अंतिम टप्पा गाठला गेला आहे. त्यांच्या या निर्णयामुळे केवळ जदयूच्या भवितव्याबाबत प्रश्नचिन्ह



निर्माण झाले नाही, तर एनडीएतील सर्वात मोठा पक्ष असलेल्या भाजपाच्या हातात सत्ता जाणार हे निश्चित झाले आहे. नितीशकुमार यांच्या निर्णयावर जदयू कार्यकर्ते संतप्त झाले होते. त्यांनी मुख्यमंत्री निवासाबाहेर आंदोलन केले. मात्र नितीशकुमार यांनी निर्णय बदलला नाही. तर महाराष्ट्राचे मॉडेल बिहारमध्ये भाजपाने आणल्याचा आरोप विरोधी पक्ष नेते तेजस्वी यादव यांनी केला आहे.

गेल्या नोव्हेंबरमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत » पान ८ वर

# सक्तीच्या धर्मांतर विरोधी विधेयकाला मंत्रिमंडळाची मंजुरी

■ मुंबई

**आज** झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत सक्तीच्या धर्मांतर विरोधी विधेयकाला मंजुरी देण्यात आली. हे विधेयक आता विधानसभेत मांडले जाईल. विधेयकानुसार सक्तीने कोणी कोणाचे धर्मांतर केले तर त्याच्यावर अजामीनपात्र गुन्हा दाखल करून ५ लाखांचा दंड आणि सात वर्षांच्या शिक्षा करण्याची तरतूद या विधेयकात आहे.

मंत्री नितेश राणे या विधेयकाबाबत म्हणाले की, अनेक हिंदुत्ववादी संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी या मुद्यावर वर्षानुवर्षे निदर्शने केली होती. त्यांच्या मागण्या लक्षात घेऊन सरकारने हे महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. नवीन कायद्यानुसार जो कोणी जबरदस्तीने, फसवणूकीने किंवा प्रलोभनाने एखाद्याचे धर्मांतर करेल त्याच्यावर अजामीनपात्र गुन्हा दाखल केला जाईल. कायद्यामुळे सक्तीच्या धर्मांतराच्या » पान ७ वर



# युद्धविरोधी ठराव फेटाळला
## ट्रम्पना स्वपक्षीयांचा पाठिंबा

■ वॉशिंग्टन

**राष्ट्राध्यक्ष** डोनाल्ड ट्रम्प यांना इराणविरूद्ध छेडलेले युद्ध थांबवण्यास भाग पाडणारा ठराव अमेरिकेच्या सिनेटने फेटाळून लावला. ट्रम्प यांच्या युद्धखोर धोरणाला सिनेटने दर्शवलेला हा पाठिंबा आहे. त्यामुळे इराणविरूद्ध सुरू असलेले युद्ध ट्रम्प अधिक ताकदीने लढवतील अशी शक्यता आहे.

दुसरीकडे इराणचे ज्येष्ठ धार्मिक नेते आयातुल्ला अब्दुल्ला जावादी-अमोली यांनी ट्रम्प आणि इस्त्रायलच्या यहुदींचा खात्मा करण्याचा फतवा जारी केला आहे. त्याचबरोबर या युद्धात आपल्याला उघड पाठिंबा देणाऱ्या चीनला इराणने होर्मुज जलमार्ग वापरण्यास परवानगी देऊन अमेरिकेला आणखी डिवचले आहे. या पार्श्वभूमीवर इराणविरुद्धचे हे युद्ध ट्रम्प यांच्या सांगण्याप्रमाणे आणखी काही आठवडे चालूच राहील, असे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

अमेरिकेच्या सिनेटमध्ये वॉर पॉवर रिझॉल्युशन नावाने मांडण्यात आलेल्या ठरावामध्ये राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्या युद्धखोरीला लगाम घालण्याची तरतूद होती. अमेरिकेच्या राज्यघटनेमध्ये असलेल्या तरतुदीनुसार कोणत्याही देशाविरुद्ध युद्ध छेडण्याचा निर्णय अमेरिकन कॉंग्रेसकडे देण्यात यावा. » पान ७ वर

# नमो उद्याने आणि ३९४ कोटी
## भास्कर जाधवांनी हिशेब मागितला

■ मुंबई

**पंतप्रधान** नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त राज्य सरकारने जाहीर केलेल्या 'नमो उद्यान' योजनेवरून विधानसभेत जोरदार चर्चा रंगली. उबाठाचे आमदार भास्कर जाधव यांनी या योजनेतील ३९४ उद्याने आणि ३९४ कोटींच्या निधी आणि कामांच्या अंमलबजावणीचा सरकारकडे हिशोब मागितला.

भास्कर जाधव यांनी सवाल केला की, राज्यातील ३९४ नगरपरिषद आणि नगरपंचायतींमध्ये प्रत्येकी १ कोटी रुपये खर्च करून 'नमो उद्यान' विकसित करण्याची घोषणा राज्य सरकारने केली होती. या योजनेसाठी एकूण ३९४ कोटी रुपयांचा निधी जाहीर केला होता. मात्र या निधीपैकी प्रत्यक्षात किती रक्कम वितरित झाली आणि घोषित केलेल्या ३९४ उद्यानांपैकी किती उद्यानांचे काम पूर्ण झाले? याशिवाय, या योजनेत उत्कृष्ट ठरणाऱ्या उद्यानांना विभागीय स्तरावर ५ कोटी, ३ कोटी आणि १ कोटी रुपयांची बक्षिसे देण्याची घोषणाही केली होती. ही बक्षिसे कोणत्या नगरपरिषदांना मिळाली आणि त्यासाठी कोणते निकष ठरवले होते? याची माहिती सरकारने जाहीर करावी.

# ई-चलनविरोधात वाहतूकदारांचा संप
## एक आठवड्यासाठी स्थगित

■ मुंबई


सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा


**राज्यातील** ई-चलन प्रणालीविरोधात वाहतूकदार संघटनांनी आक्रमक भूमिका



घेत आज बेमुदत संप पुकारला होता. त्यानंतर प्रशासनासोबत बैठक होणार असल्याने हा संप एक आठवड्यासाठी स्थगित केला. महाराष्ट्र ट्रान्सपोर्ट ॲक्शन कमिटीच्या (एम-टॅक) आवाहनानुसार काल मध्यरात्रीपासून हा संप सुरू झाला. या आंदोलनामुळे मुंबई, पुणे आणि ठाणे परिसरातील वाहतूक व्यवस्थेवर मोठा परिणाम झाला. अनेक ठिकाणी रास्ता रोको करण्यात आला.

ठाण्यातील मुलुंड जकात नाका परिसरात सकाळपासूनच आंदोलनकर्ते रस्त्यावर उतरले. बस ओनर सेवा संघासह विविध वाहतूक संघटनांनी हातात काळे झेंडे घेऊन बस आणि इतर वाहने रस्त्याच्या मधोमध उभी करत निषेध नोंदवला. त्यामुळे मुंबईकडे जाणाऱ्या महामार्गावर काही काळ वाहतूक कोंडी झाली. यावेळी » पान ७ वर

# औद्योगिक अपघातग्रस्तांना समान भरपाई द्या! मुनगंटीवार संतापले

■ मुंबई

**औद्योगिक** अपघातांमध्ये जखमी होणाऱ्या कामगारांना नुकसानभरपाई देताना भेदभाव होऊ नये, अशी मागणी करत भाजपा नेते आणि आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी विधानसभेत सरकारला धारेवर धरले. नागपूर येथील स्फोट प्रकरणातील जखमींना २५ लाख रुपयांची मदत जाहीर केली. त्याबद्दल कोणतीही तक्रार नाही. मात्र चंद्रपूरमधील दालमिया सिमेंट कंपनीतील सिड अपघातात जखमी झालेल्या कामगारांनाही तितकीच भरपाई देण्यात येणार का? असा थेट प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले की, नुकसानभरपाईचा निकष केवळ एखाद्या शहरापुरता मर्यादित ठेवू नये. नागपूरप्रमाणेच चंद्रपूरसह राज्यातील सर्व औद्योगिक अपघातांतील जखमी कामगारांना समान मदत मिळायला पाहिजे. अन्यथा ही अन्यायकारक बाब ठरेल. जगातील सर्वात उंच युद्धक्षेत्र मानल्या जाणाऱ्या सियाचीनमध्ये दरवर्षी कठोर हवामानामुळे सुमारे १६ जवानांचा मृत्यू होतो. मात्र आपल्या राज्यात तसे हवामान नसतानाही औद्योगिक अपघातांमुळे दरवर्षी २५ हून अधिक कामगारांचा बळी जातो. गेल्या दहा वर्षांत औद्योगिक » पान ७ वर

**राज्यात पुढील काही दिवस उन्हाची तीव्रता वाढणार असून, २० मार्चपर्यंत हवामान कोरडे राहणार आहे. त्यामुळे हरभरा, गहू, तंबाखू, मका यांसारखी पिके शेतकऱ्यांनी वेळेत काढून घ्यावीत, असा सल्ला ज्येष्ठ हवामान तज्ज्ञ पंजाबराव डख यांनी दिला आहे.**

# २० मार्चपर्यंत कोरडे हवामान
## महिन्याच्या अखेरीस बदल होईल
### पंजाबराव डख यांचा सल्ला

■ अहिल्यानगर

**डख म्हणाले** की, राज्यातील अनेक भागांत तापमानात मोठी वाढ होणार आहे. उत्तर महाराष्ट्रातील नंदुरबार, धुळे आणि जळगाव जिल्ह्यात १० मार्चपासून तापमान ४२ ते ४३ अंशांपर्यंत जाण्याची शक्यता आहे. कोकण पट्ट्यातही तापमान ३६ ते ३८ अंशांपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. विदर्भातील वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, यवतमाळ, वाशिम, अकोला आणि बुलडाणा या जिल्ह्यांतही १० ते २० मार्चदरम्यान उष्णतेची लाट जाणवू शकते. काही ठिकाणी तापमान ४३ अंशांपर्यंत पोहोचणार आहे. मराठवाड्यातील नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बीड, जालना, संभाजीनगर आणि धाराशिव जिल्ह्यांतही उन्हाचा पारा ४१ ते ४२ अंशांपर्यंत वाढणार आहे. सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर, पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यांत तापमान ३७ ते ३९ अंशांपर्यंत जाण्याची शक्यता असून, काही ठिकाणी अंशतः ढगाळ वातावरण राहणार आहे. २० मार्चपर्यंत हवामानात मोठा बदल होणार नसल्याने शेतकऱ्यांनी हरभरा, गहू, कांदा, तंबाखू आदी पिकांची काढणी करून घ्यावी.



# व्हीएसआर कंपनी मालकाची अखेर सीआयडी चौकशी

■ पुणे

**दिवंगत** उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान दुर्घटनेप्रकरणी तपासाला वेग आला असून, व्हीएसआर कंपनीचे मालक व्ही. के. सिंग आज पुण्यातील सीआयडी कार्यालयात चौकशीसाठी हजर झाले होते. अजित पवार यांच्या निधनानंतर शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी व्हीएसआर कंपनी व डीजीसीए माहिती लपवत असल्याचा आरोप केला होता. या आरोपांच्या पार्श्वभूमीवर सीआयडीने व्ही. के. सिंग यांना समन्स बजावून चौकशीसाठी बोलावले.

# एकनाथ शिंदेंनी ज्येष्ठ नेत्यांना डावलले
## सतत पक्ष बदलणाऱ्या वाघमारे राज्यसभेवर

■ मुंबई

**महाराष्ट्रातील** सात राज्यसभा जागांसाठी होणारी निवडणूक अखेर बिनविरोध होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. उमेदवारी अर्ज भरण्याच्या आजच्या शेवटच्या दिवशी सातच उमेदवारांनी अर्ज दाखल केल्याने मतदानाची गरज उरलेली नाही. त्यामुळे सर्व उमेदवारांची निवड निश्चित मानली जात आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



यांनी मात्र आज धक्का दिला. पक्षातील ज्येष्ठ नेत्यांना डावलून त्यांनी कॉंग्रेस, भाजपा हे पक्ष बदलून पक्षात अलिकडेच २०२३ साली आलेल्या ज्योती वाघमारे यांना उमेदवारी दिली, याचे आश्चर्य व्यक्त होत आहे.

राज्यसभेच्या सात जागांसाठी १६ मार्च रोजी मतदान होणार असून, अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस होता. भाजपाने याआधीच आपले चार उमेदवार जाहीर केले होते. माजी मंत्री विनोद तावडे, केंद्रीय राज्यमंत्री व आरपीआयचे प्रमुख रामदास आठवले, हिंगोलीचे भाजपा नेते रामराव » पान ७ वर


उद्योगपती मुकेश अंबानी, पत्नी निता अंबानी, मुलगा आकाश आणि त्याची पत्नी श्लोकासह हजर होते


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही अर्जुन आणि सानियाच्या विवाह सोहळ्याला हजेरी लावली.


मनसे प्रमुख राज ठाकरे, पत्नी शर्मिला, मुलगी उर्वशी आणि मुलगा अमितसह हजेरी लावली


ज्येष्ठ गायिका आशा भोसले यांनीही या जोडप्याला आशीर्वाद दिले


अभिनेता शाहरुख, पत्नी गौरी आणि मुलगी सुहाना सोबत उपस्थित होता.

# अर्जुन तेंडुलकर-सानियाचा मुंबईत शाही विवाह सोहळा

■ मुंबई

**मास्टरब्लास्टर** सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकरचा आज मुंबईत दिमाखदार विवाह सोहळा पार पडला. लोअर परेलच्या प्रतिष्ठित द सेंट रेगिस हॉटेलमध्ये अर्जुनची - सानिया चांडोकसोबत लग्नगाठ बांधली. अर्जुन आणि सानियाने गेल्या वर्षी २५ ऑगस्ट रोजी साखरपुड्याची घोषणा केली होती. त्यानंतर जामनगर येथील प्री-वेडिंगनंतर आज सोहळा पार पडला. या भव्य समारंभाला तेंडुलकर कुटुंबातील सदस्य, जवळचे मित्र आणि क्रिकेट, बॉलिवूड आणि उद्योग यांसह विविध क्षेत्रांतील अनेक मान्यवर उपस्थित होते.


उद्धव ठाकरे, रश्मी ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांनीही वधु-वरांना शुभेच्छा दिल्या.


क्रिकेटपटू महेंद्र सिंग धोनी आणि साक्षी यांनी हजेरी लावली


शंकर महादेवन देखील पत्नी संगीता महादेवनसोबत


युवराज सिंग आणि हेझल कीच


अभिषेक बच्चन आणि पत्नी ऐश्वर्या राय बच्चन


क्रिकेटपटू राहुल द्रविड आणि पत्नी विजेता पेंढारकर


झहीर खान त्याची पत्नी आणि माजी अभिनेत्री सागरिका घाटगेसोबत दिसला.


कॅबिनेटमंत्री आशिष शेलार आणि पत्नी प्रतिमा शेलार उपस्थित होते.


सुनील गावस्कर आणि त्यांची पत्नी मार्शनील गावस्कर


स्टार कपल हरभजन सिंग आणि गीता बसरा


अजिंक्य रहाणे त्याची पत्नी राधिका धोपावकरसोबत

# बैल धुताना विजेचा शॉक लागून दोघांचा जागीच मृत्यू



■ बेळगाव

**जनावरांच्या** गोठ्यावर बैल धुताना विद्युत मोटरचा शॉक लागून दोघांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना काल बुधवारी सायंकाळी घडली. धीरज सहदेव नाईक (२८) आणि भगवान खंडू सोनवणे (६५) अशी या दोघा मृतांची नावे आहेत. ही दुर्घटना निपाणी तालुक्यातील हुपरी गावात घडली.

धीरज नाईक हा आपले मामा उद्योजक धनंजय खेमलापुरे यांच्या हुपरी गावी राहत होता. तो जनावरांच्या गोठ्यात विद्युत मोटारीला पाईप लावून सायंकाळी बैल धूत होता. यावेळी त्याला मोटारीच्या तारेचा जोरदार धक्का लागून तो जागेवरच कोसळला. ही घटना पाहून तेथेच काम करीत असलेले भगवान सोनवणे यांनी धीरजला उठविण्याचा प्रयत्न केला. त्यांनाही विजेचा जोरदार धक्का बसला आणि तेही जागेवरच कोसळले. दोघांनाही टाकला आरोग्य केंद्रात दाखल केले. परंतु डॉक्टरांनी तपासणी केली असता दोघांचाही मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले.

धीरज नाईकचे मूळ गाव भोज असून, मामांच्या कामकाजात मदत करण्यासाठी तो काही वर्षांपासून हुपरीत राहत होता. केवळ दीड वर्षांपूर्वी त्याचे लग्न झाले होते.

# चौथी, सातवी शिष्यवृत्ती परीक्षा अर्ज भरण्यास पुन्हा मुदतवाढ

■ मुंबई

**महाराष्ट्र** राज्य परीक्षा परिषदेतर्फे प्राथमिक व उच्च प्राथमिकच्या इयत्ता चौथी व सातवी इयत्तेतील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षांचे ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी पुन्हा ६ मार्चपर्यंत मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे आता शाळा आणि विद्यार्थी ६ मार्चपर्यंत नियमित शुल्कासह अर्ज भरू शकतील. इयत्ता चौथी व इयत्ता सातवीची शिष्यवृत्ती परीक्षा २६ एप्रिल रोजी राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी घेण्यात येणार आहे. या परीक्षेसाठी शाळा नोंदणी व विद्यार्थी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी ३० डिसेंबर २०२५ ते २८ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत मुदत देण्यात आली होती. मात्र त्यानंतर शाळा नोंदणी व विद्यार्थी आवेदनपत्र, शुल्क भरणा करण्यासाठी अतिरिक्त मुदत देण्यात यावी, यासाठी अनेक शाळांकडून परीक्षा परिषदेकडे विनंती करण्यात आली होती.

# सायन रेल्वे उड्डाणपुल खर्चात तबब्ल ५ कोटी ३४ लाखांची वाढ

**येत्या १५ जुलैपर्यंत वाहतुकीसाठी खुला**

■ मुंबई

**मध्य** रेल्वेच्या सायन स्थानकावरील ब्रिटिशकालीन ११२ वर्षे जुन्या उड्डाणपुलाच्या पुनर्बांधणी कामाच्या खर्चात आता वाढ झाल्याचे दिसून येत आहे. स्टील गर्डर आणि पोहोच रस्त्याचे काम आदींमध्ये अतिरिक्त वाढ झाली आहे. त्यामुळे २६ कोटी २८ लाख २८ हजार या मूळ खर्चात ५ कोटी ३४ लाख ५७ हजार ४२६ रुपयांनी वाढ झाली आहे. आता या पुलाचा एकूण खर्च ३१ कोटी ६२ लाख ८५ हजार ४६९ रुपयांवर पोहोचला आहे.

या रेल्वे उड्डाणपूल पुनर्बांधणी खर्चाची मूळ किंमत २६ कोटी २८ लाख २८ हजार ०४३ रुपये इतकी होती. यातील फेरफार किंमत ५ कोटी ३४ लाख ५७ हजार ४२६.०० इतकी झाली आहे. त्यामुळे आता एकूण खर्चाचा आकडा ३१ कोटी ६२ लाख ८५ हजार ४६९ रुपये इतका झाला आहे. हा पूल येत्या १५ जुलैपर्यंत वाहतुकीसाठी खुला करण्याचे पालिकेचे उद्दिष्ट आहे. या पुलाच्या पुनर्बांधणीत पाचवी व सहावी मार्गिका मधूनच येत असल्यामुळे पुनर्बांधणीचे काम रेल्वेमार्फत हाती घेतले आहे. त्यानुसार पोहचरस्त्याचे काम हे पालिकेतर्फे सुरू आहे. पाचवी व सहावी मार्गिका मध्ये येत असल्यामुळे पुनर्बांधणीसाठी येणारा खर्च हा मध्य रेल्वेला देण्यात येणार आहे. तर पुलाच्या पोहोच रस्त्याचे काम मुंबई पालिका करणार आहे. या पुलाचा आराखडा नियोजन, संकल्पचित्रे, अंदाजपत्रक व मसूदापत्र बनविणे यासाठी मेसर्स स्पेक्ट्रम कन्सल्टंट प्रा.लिमिटेड यांची तांत्रिक सल्लागार म्हणून नेमणूक केली आहे.

# भाजपाकडून आज आणि उद्या नगरसेवकांसाठी प्रशिक्षण वर्ग

■ मुंबई

**भाजपाच्या** वतीने ७ व ८ मार्च रोजी नगरसेवकांसाठी दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. हा प्रशिक्षण वर्ग दादर येथील वसंत स्मृती कार्यालयात होणार आहे. या प्रशिक्षण वर्गात महानगरपालिकेत प्रभावीपणे काम कसे करावे, याबाबत नगरसेवकांना मार्गदर्शन केले जाणार आहे. तसेच नागरिकांच्या विविध समस्या सोडवण्याच्या पद्धतींवर चर्चा होणार असून, जनतेची कामे पूर्ण होईपर्यंत सातत्याने पाठपुरावा कसा करावा, यावर विशेष भर दिला जाणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रभावी कामकाजासाठी आवश्यक असलेल्या विविध प्रशासकीय आणि विकासात्मक मुद्द्यांवरही या वर्गात मार्गदर्शन केले जाणार आहे. याशिवाय मतदारसंघात अनधिकृत फेरीवाले तसेच बांगलादेशी व रोहिंग्या घुसखोरीसंदर्भात कोणती खबरदारी घ्यावी आणि त्यावर उपाययोजना कशा कराव्यात, याबाबतही माहिती दिली जाणार आहे.

# स्त्रीभ्रूण हत्या रोखण्यासाठी कायदा कडक करणार

■ मुंबई

**आरोग्यमंत्र्यांची ग्वाही**

**गर्भधारणापूर्व** व प्रसूतीपूर्व निदान तंत्र (लिंग निवडीस प्रतिबंध) कायदा १९९४ सुधारित २००३ ची राज्यात प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत बैठक आरोग्यमंत्री प्रकाश आबीटकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.



या बैठकीला विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल, महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन, वैद्यकीय शिक्षण विभाग व व सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, आयुक्त तथा (आ.से) डॉ. कादंबरी बलकवडे, संचालक आरोग्य सेवा, अतिरिक्त संचालक, राज्य कुटुंब कल्याण कार्यालय यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. महाराष्ट्रसारख्या पुरोगामी राज्यात स्त्रीभ्रूण हत्या रोखणे ही सामाजिक आणि कायदेशीर जबाबदारी आहे. अशा प्रकारचे गुन्हे वारंवार होत असल्यास त्यांच्यावर अधिक कठोर कारवाई करण्याची गरज आहे. काही ठिकाणी हे प्रकार संघटीत स्वरूपात होत असल्याची शक्यता नाकारता येत नसल्याने अशा प्रकरणांत मोका कायद्यांतर्गत कारवाई करता येईल का, याबाबत न्याय व विधी विभागाने अभ्यास करून अभिप्राय द्यावा, असे त्यांनी सांगितले.

# फी न भरल्यामुळे विद्यार्थिनीला शाळेतून काढणे बेकायदेशीर

**उच्च न्यायालयाचा निर्णय**

■ मुंबई

**शालेय** शुल्काची थकबाकी न भरल्यामुळे १३ वर्षीय विद्यार्थिनीला शाळेतून काढून टाकणाऱ्या शाळेला उच्च न्यायालयाने चांगलेच फटकारले. केवळ फी भरली नाही, या एका कारणावरून विद्यार्थिनीला शाळेतून काढणे बेकायदेशीर आहे. शाळेची ही कृती अजिबात खपवून घेणार नाही, असे ताशेरे न्यायालयाने ओढले आणि शाळेने दिलेले 'ट्रान्सफर सर्टिफिकेट' रद्द करून विद्यार्थिनीला मोठा दिलासा दिला. न्या. अनिल किलोर आणि न्या. राज वाकोडे यांच्या खंडपीठाने हा महत्त्वपूर्ण निर्णय दिला.

शाळेच्या मनमानी, बेकायदेशीर धोरणाला आव्हान देत भंडारा जिल्ह्यातील विद्यार्थिनीने उच्च न्यायालयाचा दरवाजा ठोठावला होता. या प्रकरणाच्या सुनावणीवेळी प्राथमिक शिक्षण पूर्ण होण्यापूर्वी कोणत्याही मुलाला शाळेतून काढणे हे 'शिक्षण हक्क कायदा, २००९' च्या कलम १६(४) चे थेट उल्लंघन आहे. अशाप्रकारे कोणत्याही विद्यार्थ्याला शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर काढता येणार नाही, असे ताशेरे खंडपीठाने शाळेवर ओढले.

'फादर अ‍ॅग्नेल स्कूल' या शाळेने आपल्याला आरटीई कायदा लागू होत नसल्याचा दावा केला होता. तथापि, शाळेचा दावा न्यायालयाने धुडकावला. सीबीएसई शाळा चालवताना देखील राज्य सरकारच्या नियमांचे पालन करणे बंधनकारकच आहे. कोणत्याही माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या हक्कावर गदा आणता कामा नये, असेही खंडपीठाने खडसावले.

# जुनी चिखलवाडीतील रहिवाशांना एकनाथ शिंदे यांच्या हस्ते चाव्या वाटप

■ मुंबई



**मुंबईतील** ग्रँट रोड परिसरातील जुनी चिखलवाडीचा पुनर्विकास पूर्ण झाला असून, येथील २६५ रहिवाशांना हक्काच्या घरात जाण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत या रहिवाशांना हक्काच्या घरांच्या चाव्यांचे वाटप उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

गेली २५ वर्षे जुन्या चिखलवाडीचा पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित होता. या काळात ३६ विकासकांनी हा पुनर्विकास करण्याचा प्रयत्न केला. अखेरीस ३७ वे विकासक म्हणून आलेल्या श्रीपती डेव्हलपर आणि आमदार पराग शहा यांनी मिळून हा प्रकल्प हातात घेऊन पूर्ण केला. अवघ्या २ वर्षांत या इमारतींचे काम पूर्ण झाले असून, त्यामुळे २६५ रहिवाशांना घर देणे शक्य झाले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत काही रहिवाशांना प्रतिकात्मकरित्या या चाव्यांचे वाटप करण्यात आले. यावेळी आमदार पराग शहा, म्हाडाचे अध्यक्ष संजीव जयस्वाल, मुख्याधिकारी मिलिंद शंभरकर, श्रीपती डेव्हलपर्सचे सतीश चतुर्वेदी, जुनी चिखलवाडी रहिवाशी संघाच्या अध्यक्ष सुरेखा परब आदी उपस्थित होते.

# धर्मापेक्षा विमानतळ सुरक्षा महत्त्वाची कोर्टाने नमाजला परवानगी नाकारली

■ मुंबई

**धर्मापेक्षा** विमानतळाची सुरक्षा ही महत्त्वाची असून, कोणत्याही धार्मिक अथवा अन्य कारणासाठी तडजोड होऊच शकत नाही. असे स्पष्ट करत उच्च न्यायालयाने विमानतळ परिसरात रमजाननिमित्त नमाज पठण करण्याची मागणी फेटाळून लावली. न्यायमूर्ती बर्गिस कुलाबावला आणि न्यायमूर्ती फिरदोश पुनीवाला यांच्या खंडपीठाने अखेर सुरक्षेच्या कारणास्तव याचिका निकाली काढली.

सुरक्षेच्या कारणास्तव, सध्या सुरू असलेल्या पवित्र रमजान महिन्यातही, छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या स्थानिक विमान टर्मिनल परिसरातील तात्पुरत्या शेडमध्ये रिक्षा-टॅक्सी आणि ओला-उबर कॅब चालकांना नमाज पठण करण्याची परवानगी द्यावी, या मागणीसाठी टॅक्सी-रिक्षा ओला-उबर मेन्स युनियननेउच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती.






संस्थापक-नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

संपादकीय

नवाकाळ

|| न मे भक्त प्रणश्यति ||

# यंदाच्या उन्हाळ्याचे दुहेरी चटके

**आखाती** देशातील युद्धाचा चटका बसत असताना आता उन्हाळ्याच्या कडक झळाही जाणवू लागल्या आहेत. या युद्धाचे पर्यावरणाच्यादृष्टीने होणारे दुष्परिणाम आहेतच. परंतु आखाती देशातून मिळणाऱ्या इंधन पुरवठ्यावर मोठा परिणाम होण्याची शक्यता असल्याने अनेक वस्तूंची टंचाई निर्माण होईल. जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीदेखील भडकण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणजे यावेळचा उन्हाळा हा दुहेरी चटका देणारा ठरेल असेच एकूण वातावरण आहे. पुढच्या आठ- पंधरा दिवसांत जरी युद्ध थांबले तरी सगळी परिस्थिती पूर्ववत व्हायला पुढचा महिना-दीड महिना लागू शकतो. इराण आणि अन्य अरब देशांचे दुखावलेले संबंध हे भविष्यकाळात कितपत पूर्ववत होतील याबद्दल शंका आहे. प्रामुख्याने या सगळ्या अरब देशांचे अर्थकारण हे इंधन उत्पादन आणि तत्संबंधीचा व्यापार याच्याशी निगडीत असते. भारतासारखा सर्वाधिक लोकसंख्या असलेला देश या देशांकडूनच मोठ्या प्रमाणावर तेल खरेदी करतो. आणि त्याच्या मोबदल्यात अन्य कृषी आणि औद्योगिक उत्पादनांचा व्यापारही करीत असतो. परंतु आता विस्कटलेली सगळी घडी पूर्ववत होता होता बराच कालावधी जाईल. त्याचा परिणाम म्हणूनच भारतात बऱ्याच वस्तूंची टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सरकारने युद्ध लक्षात घेऊनच आपला तेलसाठा तयार ठेवला होता. परंतु देशभरातील एकूण इंधनाची मागणी आणि पुरवठ्याचे प्रमाण लक्षात घेतले तर हा साठा फार काळ टिकणारा नाही. स्वाभाविकपणे इंधनाचा तुटवडा हा इंधनाच्या किंमतवाढीमध्ये होतो. आणि इंधन किंमतवाढीचे परिणाम हे अगदी जीवनावश्यक वस्तूंच्या भाववाढीपर्यंत पोहोचतात. आज तशीच परिस्थिती निर्माण होऊ घातलेली आहे. भारताला जरी रशियाकडून काही प्रमाणात तेल मिळत असले तरी एकूण गरजेचा विचार केला तर हा सगळा इंधन पुरवठा कायम ठेवणे म्हणजेच विशिष्ट कालावधीत विशिष्ट साठा तयार ठेवणे भारताला आवश्यक ठरते. यातला लक्षात घेण्याजोगा भाग असा आहे की, इराणने इतर सगळ्याच अरब देशांवर हल्ले केल्याने तिथली परिस्थिती अस्थिर झालेली आहे.

### महागाई आणि पाणीटंचाई

उन्हाळा म्हटल्यानंतर पाणी टंचाई हा प्रकार कायमचा ठरलेला असतो. व्यापक अर्थाने बघितले तर पाणीसुद्धा व्यक्ती आणि समाजाचे व्यवहार सुरळीत चालू ठेवण्यासाठीचे महत्त्वपूर्ण इंधन ठरते. युद्धाच्या निमित्ताने काही वस्तूंची टंचाई निर्माण होत असताना राज्याच्या अनेक भागांमध्ये पिण्याच्या पाण्याचे प्रश्न आतापासूनच निर्माण होऊ लागले आहेत. खानदेश, मराठवाडा, विदर्भाचा काही भाग, पश्चिम महाराष्ट्रातले काही जिल्हे हे पाणीटंचाई सदृष्य परिस्थितीत आहेत. उत्तर महाराष्ट्रात जळगावला आतापासूनच एक दिवसाआड पाणी द्यायला सुरुवात झालेली आहे. इतर जिल्ह्यांमध्येसुद्धा पुढच्या दोन-तीन आठवड्यात अशीच काहीशी परिस्थिती निर्माण होऊ शकते. हवामान खात्याच्या अंदाजाप्रमाणे मार्च महिन्याच्या अखेरीपर्यंत उन्हाची तीव्रता वाढण्याची शक्यता आहे. हे तापमान नेहमीपेक्षा जास्त असेल असाही वेधशाळांचा कयास आहे. स्वाभाविकपणे पिण्याच्या पाण्याचे प्रश्न निर्माण होऊ लागले आहेत. खरे तर यावर्षी सगळीकडे चांगला पाऊस झाला. नद्या, धरणं, ओसंडून वाहत होते. परंतु पाण्याची वाढती मागणी, शिवाय पाण्याचा अपव्यय या कारणांनी हे परंपरागत पाणीसाठे पाण्याची वाढती गरज भागवू शकत नाहीत. यातला एक वेगळाच प्रश्न म्हणजे वाढत्या तापमानाने धरणं किंवा जलसाठ्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बाष्पीभवन होते. आणि पाण्याची पातळी खाली जात राहते. याचा अर्थ पाणी साठवण्याच्या आणखी वेगळ्या पद्धती विकसित करणे आवश्यक ठरते. बऱ्याच ठिकाणी जलसिंचनाच्या योजना पूर्णत्वाला जाऊ शकलेल्या नाहीत. अगदी जलयुक्तशिवारसारख्या योजनांचाही प्रभाव पडू शकलेला नाही. अशा एक ना अनेक कारणांमुळे पाणी साठा खालावत जातो. सरकारकडून दरवर्षीप्रमाणे टँकरच्या मार्फत ठिकठिकाणी पाणी पुरवलेही जाते. परंतु पिण्याच्या पाण्याचा प्रश्न हा दिवसेंदिवस गंभीर होत चाललेला आहे. वाढती लोकसंख्या, वेगाने होणारे नागरीकरण मात्र त्याप्रमाणात जलसिंचनाच्या सोयीसुविधा पूर्ण केल्या जात नाहीत. विशेषतः ग्रामीण किंवा निमशहरी भागाकडे दुर्लक्ष होते. जुने प्रकल्पही वेळेत पूर्ण होत नाहीत. म्हणूनच भरपूर पाऊस पडूनही पाण्याची टंचाई भेडसावत राहते.

### पाण्यासाठीही युद्धच

दरवर्षीचा हा पाणीटंचाईचा चटका आदिवासी भागासह ग्रामीण महाराष्ट्राला सहन करावा लागतो. याचे आणखी एक महत्त्वाचे कारण म्हणजे सरकारकडून मोठ्या महानगरांचाच प्राधान्याने विचार होतो. याची अगदी ताजी दोन ठळक उदाहरणे म्हणजे मुंबईचा पाणीपुरवठा अखंड राहावा म्हणून दोन नव्या योजना अंमलात आणल्या जात आहेत. त्याच्यावर जवळपास १५ हजार कोटी रुपये खर्च होणार आहेत तर पुढच्या पाच वर्षांत येऊ घातलेल्या तिसऱ्या मुंबईचा विचार करून आतापासूनच पाणीपुरवठ्याच्या मोठ्या योजना हाती घेतल्या आहेत. त्याच्या प्राथमिक कामासाठी दहा हजार कोटी रुपये मंजुरही झालेले आहेत. याच्या उलट आदिवासी किंवा ग्रामीण भागात छोट्या छोट्या पाणीयोजनासुद्धा निधीच्या टंचाईचे कारण देऊन पूर्णत्वाला जाऊ शकत नाहीत. याचा अर्थ पाणी पुरवठ्याबाबत नियोजनपूर्वक धोरण राबवले जात नाही. किंबहुना हाती घेतलेल्या पाणीपुरवठा प्रकल्पांचा पाठपुरावा होत नाही. अगदी महाराष्ट्राच्या जिल्हा ठिकाणीसुद्धा उन्हाळाच नव्हे तर वर्षभर दोन ते तीन दिवसाआड एकदाच पाणीपुरवठा केला जातो. आज पूर्वीइतका दुष्काळाचा प्रभाव जरी जाणवत नसला तरी गावागावातील पाणीटंचाईची समस्या कायम असल्याचेच म्हणावे लागते. भरपूर पाऊस पडूनही ही परिस्थिती निर्माण होत असेल तर पावसाप्रमाणे नियोजनही गैरकारभाराच्या महापुरात वाहून जाते असे म्हणावे लागेल. यंदाची परिस्थिती लक्षात घेतली तर पाण्यासाठीदेखील लोकांना युद्धाचाच सामना करावा लागतो आहे.

# भारत अंतिम सामन्यात

पान १ वरून

धुलाई केली. या जोडीने दुसऱ्या विकेटसाठी ९७ धावांची भागिदारी केली. भारताची धावसंख्या ९.२ षटकांत १ बाद ११७ वर पोहोचली असताना आदिल रशीदच्या गोलंदाजीवर ईशान किशन मोठा फटका मारताना झेलबाद झाला. शिवम दुबे आणि संजू यांनी मोठे फटके मारून धावांची गती कमी होऊ दिली नाही. १३ षटकांत २ बाद १६० धावा झाल्या असताना संजू सॅमसन देखील झेलबाद झाला. त्याने ४२ चेंडूंवर ७ षटकार आणि ८ चौकारांसह ८९ धावा केल्या.

सूर्यकुमार यादव ११ धावा करून माघारी परतला. त्यानंतर शिवम दुबे आणि हार्दिक पंड्या यांनीही इंग्लंडच्या गोलंदाजांचा चांगला समाचार घेतला. धावसंख्या २१२ वर पोहोचताच शिवम दुबे धावचित झाला. त्याने २५ चेंडूंत ४ षटकार आणि १ चौकारांसह ४३ धावा केल्या. तिलक वर्माने ७ चेंडूंत ३ षटकारांसह २१ धावा करून बाद झाला. त्याचा आर्चरने त्रिफळा उडवला. शेवटी हार्दिक पंड्यानेही चांगले फटके मारले. त्यामुळे भारतीय संघाने निर्धारित षटकात ७ बाद २५३ धावांपर्यंत मजल मारली. या धावसंख्येचा पाठलाग करताना दुसऱ्या षटकात इंग्लंडचा पहिला बळी फिल सॉल्टच्या रुपात गेला. हॅरी ब्रूकही ७ धावा करून बाद झाल्यामुळे इंग्लंडची अवस्था ४.१ षटकांत २ बाद ३८ अशी झाली. जोस बटलरची साथ घेऊन जेकब बेथेलने भारतीय गोलंदाजांवर जोरदार हल्ला चढवला. मात्र बटलरचा (२५) वरुणने त्रिफळा

## जेकबची शतकी खेळी वायला

उडवला. मात्र जेकब बेथेल चौकार आणि षटकार ठोकत होता. टॉम बँटन ५ चेंडूंत १७ धावा करून माघारी परतला. विल जॅक्स आणि जेकब यांनी चौकार आणि षटकार ठोकून संघाची धावसंख्या १२ षटकांत १४५ वर पोहोचवली. परिणामी भारतीय गोलंदाज दबावात आले.

या जोडीसमोर विजयासाठी शेवटच्या ४२ चेंडूंत ९४ धावांची गरज होती. अक्षर पटेल विल जॅक्सचा झेल पकडत असताना सीमारेषा पलिकडे जाण्याआधी दुबेकडे झेल फेकला आणि तो दुबेने पकडला. विल जॅक्सने २० चेंडूंत ३५ धावा केल्या. जसप्रीत बुमराहने १६ वे षटक चांगले टाकल्यामुळे इंग्लंडवर दबाव वाढला. सॅम करन आणि



जेकब या जोडीपुढे विजयासाठी १८ चेंडूंत ४५ धावांची आवश्यकता होती. जसप्रीत बुमराहने १८ व्या षटकात ६ धावा दिल्या. मग हार्दिक पंड्याच्या १९ षटकांच्या पहिल्या चेंडूवर जेकबने षटकार ठोकून शतक पूर्ण केले.

या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर सॅम करन सीमारेषेवर झेलबाद झाला. मग इंग्लंडला विजयासाठी शेवटच्या षटकांत ६ चेंडूंत ३० धावांची गरज होती. दुबेच्या २० व्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर दुसरी धाव काढत असताना जेकब धावचित झाला. त्याने ४८ चेंडूंत १०४ धावा केल्या. उर्वरित चेंडूंवर आर्चरने चांगले फटके मारले. मात्र तरी देखील इंग्लंडचा संघ ७ धावांनी विजयापासून दूर राहिला.

# एमएसीसीआयएच्या क्रीडा उद्योग विकास विभागाची स्थापना

■ मुंबई

**महाराष्ट्र चेंबर** ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ॲग्रिकल्चरने (एमएसीसीआयए) क्रीडा उद्योग विकास विभागाची अधिकृत स्थापना २१ जानेवारी रोजी केली. शतक महोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या एमएसीसीआयएने या उपक्रमाद्वारे क्रीडेला औद्योगिक ओळख देत राज्याच्या क्रीडा अर्थव्यवस्थेला नवी दिशा दिली. रोजगारनिर्मिती, गुंतवणूक आणि जागतिक संधीचा महामार्ग खुला करण्याचा निर्धार या नव्या विभागाने केला.

विभागाच्या चेअरमनपदी सुनील वालावलकर, सहचेअरमनपदी मंदार वैद्य, सदस्यपदी क्षितिज वेदक, बाळासाहेब (बाळ) तोरसकर, विपुल सोळंकी, वैशाली भिडे-बर्वे, पौलोमी कुंडू, रवींद्र माणगावे (अध्यक्ष, एमएसीसीआयए) आणि करुणाकर शेट्टी (उपाध्यक्ष, एमएसीसीआयए)असणार आहेत. त्यांच्या अनुभवसंपन्न नेतृत्वामुळे या विभागाच्या कामाला अधिक बळ मिळणार आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई-निविदा सूचना क्र /०८/२०२६ (मुदतवाढ)

दि. १७/०२/२०२६ रोजी **नवाकाळ, मुंबई** या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या निविदा सूचना क्र. ०८ सन २०२६ व तदनंतरची मुदतवाढ सूचना दि. २८/०२/२०२६ मधील काम क्र. **ब (१)** ची कोरी ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध होण्याचा कालावधी दि. १६/०३/२०२६ ते दि. ०९/०४/२०२६ असा वाढविण्यात आलेला आहे.

या व्यतिरिक्ति निविदा सूचनेमधील इतर बाबींमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

महावितरण
वीज बंदबाबत जाहीर निवेदन

उल्हासनगर विभाग-१ अंतर्गत १७ सेक्शन (सं व सु -२) उपविभाग उल्हासनगर मधील वीज ग्राहकांना कळविण्यात येते की, दि. ०६/०३/२०२६ रोजी खालील वाहिनीचा वीज पुरवठा खाली दर्शविलेल्या वेळेत बंद राहील. तरी ग्राहकांनी कृपया सहकार्य करावे.

| उपकेंद्र | फिडर | वेळ | प्रभावित क्षेत्र | कामाचा तपशिल |
|---|---|---|---|---|
| २२/२२ केव्ही साईबाबा स्विचिंग स्टेशन | २२ केव्ही. इंडस्ट्रियल फिडर ३०९ | १५.०० ते १७.०० | अशोकनगर, ओटी सेक्शन, अयोध्यानगर, पिंटो पार्क, वडलगाव, पेहलुमल कंपाउंड, संतोष नगर, धरमदरबारजवळील एरिया. | एन.एस.सी.योजनेअंतर्गत नवीन एच.टी. लाईनची उभारणी आणि संबंधित कामे |

सही/-
कार्यकारी अभियंता, उल्हासनगर विभाग-१

TENDER NOTICE
**OBEROI SPRINGS CO-OPERATIVE SOCIETY LTD.**, Andheri (W), Mumbai invites sealed quotations from eligible contractors/scrap dealers for **dismantling of old STP and disposal/sale of scrap material, including old STP structure, MS and PVC pipes, fibre & PVC tanks, motors, plumbing pipes, and MS drainage grills, etc.**
Work includes dismantling, segregation, loading, and removal of scrap material.
Sealed quotations to be submitted at the Society Office on or before **15th March 2026.**
The Society reserves the right to rejects any bids without assigning any reasons thereof.
**OBEROI SPRINGS CO-OPERATIVE SOCIETY LTD.**
Oshiwara Link Road, Near Monginis, Andheri (West), Mumbai – 400053
Date: 06.03.2026 Place: Mumbai

MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.
E-TENDER NOTICE

**Tender Specification No.** CE(C)-III/PUNE HPS/Rfx No. 3000066461, 3000066462, 3000066463, 3000066464, 3000066465, 3000066556/ FY-2025-26.
**Name of work:**
1) Extension of runoff RCC gutter near HPS building at Varasgaon HPS.
2) Repairing of Bituminous main approach road and providing gate at HPS Ujjani.
3) Repair of existing parking shed and panelling work for service bay area at HPS Panshet.
4) Biennial work of outsourcing of upkeepment related work for rest house at Kasba Peth, Pune (for 24 months).
5) Biennial Civil Maintenance and up keeping of Hydro power stations assets, at Dimbhe HPS.
6) Hiring vehicle services for day to day official and field work for civil section officers at REC, Pune.

**Sale period :-** 05.06.2026 at 11:00 Hrs. to 25.03.2026 up to17:00 Hrs. | **Submission Date :-** 26.03.2026 up to11:00 Hrs.

Kindly see the company's website https://eprocurement.mahagenco.in. For detailed tender notice.

**Contact person-** Executive Engineer (c), O/o Chief Engineer (Civil) -III, M.S.P.G. Co. Ltd., Mumbai **Fax :**( 022)26581469 **Tel.No.**022-26474211 extn. 2590, 26472131

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी, जि. ठाणे
बांधकाम विभाग, प्र.स.क्र.०२

ई-निविदा सूचना क्र. १९६ /२०२५-२६

**भिवंडी नि.शहर महानगरपालिकेच्या बांधकाम विभागा मार्फत खालील नमुद कामाचे निविदा फॉर्म** mahatenders.gov.in **या संकेतस्थळावर दिनांक** ०६/०३/२०२६ **ते दि.** १३/०३/२०२६ **पर्यंत विक्रीस उपलब्ध आहे.**

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १. | भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दितील वॉर्ड क्र.१५ येथील शाळा क्र. ६८ समोर जेष्ठ नागरिक कट्टा तयार करणे | ४,९७,५६१/- |
| २ | भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दितील वॉर्ड क्र. १२ क मधील समदानी पहाडी, न्युआझादनगर व विविध ठिकाणी गटार, पाथवेज व पेव्हरब्लॉक बसविणे | १९,९६,१८१/- |
| ३ | भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दितील प्रभाग क्र. १४/क पिरानीपाडा, नदियापार विविध ठिकाणी गटार व पाथवेज तसेच पेव्हरब्लॉक बसविणे | १९,९४,५१७/- |
| ४ | भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दितील वॉर्ड क्र. १४ पिराणीपाडा येथे गटार व पायवाट तयार करणे | १९,९४,५४६ |

वरील ऑनलाईन निविदा दि. १३/०३/२०२६ पर्यंत दुपारी ४.०० पर्यंत स्विकारण्यांत येतील. तसेच सदरची निविदा ही दि. १६/०३/२०२६ रोजी संध्या. ४.०१ वाजता अथवा कार्यालयीन कामकाजाच्या सोयीप्रमाणे निविदा समिती समक्ष उघडण्यांत येईल. अधिक माहिती महानगरपालिकेच्या उक्त नमुद संकेत स्थळावरून प्राप्त होऊ शकेल अथवा नविन शासकिय इमारतीमधील ५ मजल्यावरील बांधकाम विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा.

सही/-
(जमील पटेल)
शहर अभियंता
जा.क्र./ज.सं.वि./२०७ दि. ०५/०३/२०२६
भि. नि.शहर महानगरपालिका,भिवंडी

**सुविचार**

**विलास कोळेकर**
खंडाळा, रत्नागिरी. मोबा.९४२२४२०६११

रंग, रुप पाहून माणसाचा स्वभाव कधीही शोधू नका.
निष्ठावंत आणि प्रामाणिक लोक हे नेहमी साधारणच असतात.

**पंचांग**

**शुक्रवार, ६ मार्च २०२६**
**शक १९४७ विश्वावसुनामसंवत्सर**



*** फाल्गुन कृष्ण तृतीया**
**नक्षत्र - हस्त**
**-: जन्मराशी :-**
**००-०१ ते २४-१८ कन्या**
**२२-१९ ते २४-०० तूळ**

**रवी उदय- ०६-५५**
**रवी अस्त- १८-४५**

**संकष्ट चतुर्थी, चंद्रोदय रात्री ९.२०,**
**छत्रपती श्री शिवाजी महाराज जयंती (तिथिप्रमाणे)**

मुद्रक, प्रकाशक **सौ. जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे** यांनी हे दैनिक नवाकाळ ऑफिस आणि नवाकाळ प्रेस करिता दांगट मीडिया प्रा.लि., पत्ताः प्लॉट नं. २२, दिघा एमआयडीसी, टीटीसी इंडस्ट्रीयल एरीया, विष्णू नगर, दिघा, नवी मुंबई -४००७०८ येथे छापून घेतले व नवाकाळ बिल्डिंग, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगांव, मुंबई -४००००४ येथे प्रसिद्ध केले.
संपादक : **रोहित रमाकांत पांडे** • कार्यकारी संपादकः **समीर करंबे** (*पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी कार्यकारी संपादक यांच्यावर आहे.)

संपर्क : संपादक विभागः ८६५२२०१४४०,
जाहिरात विभाग : ८१०८११६४२३, ८१०८११६४२९,
छोट्या जाहिरातीः ८४२२८१७४४५. वितरण विभाग : ९५९४९३६४४१
ई-मेलः contact@navakal.in
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक
'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

Printed and Published by **Jayshree Ramakant Khadilkar-Pande** On behalf of Navakal Office And Navakal Press. Printed at Dangat Media Pvt. Ltd., Address : Plot No.22, Digha M.I.D.C., TTC Industrial Area, Vishnu Nagar, Digha, Navi Mumbai - 400 708. Published at Navakal Building, 13 Navakal Path, Khadilkar Road, Girgaum, Mumbai - 400 004.
Editor - **Rohit Ramakant Pande** • Executive Editor - **Sameer Karambe** (*As per P.R.B. law Executive Editor will be responsible for all the content in Daily Navakal)

जाहीर सूचना

येथे सूचना देण्यात येते की, **श्री. सदाशिव दामोदर निजप** हे **फ्लॅट क्र. सी/४९**, मोजमाप सुमारे ३०० चौ. फूट कार्पेट क्षेत्र, **चौथा मजल्यावर, म्युनिसिपल स्टाफ दीप्ती को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., गुरुमुद्रा, परागनगर, प्लॉट क्र. २, नोव्हेल्टी सिल्क मिल्स समोर, एस. व्ही. रोड, दहिसर (पूर्व), मुंबई-४०० ०६८** चे मालक होते, जे नोंदणी जिल्हा व उपजिल्हा मुंबई शहर व मुंबई उपनगर यांच्या कार्यक्षेत्रात येतो, सी.टी.एस. क्र.१४४२, **गाव दहिसर, तालुका बोरीवली, मुंबई** उपनगर जिल्हा येथील जमिनीवर बांधकामित **(सदर फ्लॅट)**. **श्री.सदाशिव दामोदर निजप** यांचे दिनांक ११.०२.२०१४ रोजी निधन झाले, त्यांच्या पश्चात एकमेव कायदेशीर वारस म्हणजे: १) सौ. प्रमिला सदाशिव निजप, २) श्री. सुनील सदाशिव निजप, ३) सौ. जयश्री जगदीश धनू

त्यानंतर, श्री. सुनील सदाशिव निजप व सौ. जयश्री जगदीश धनू यांनी दिनांक २७ जून २०२४ च्या नोंदणीकृत रिलीझ डीडद्वारे सदर फ्लॅटमधील आपापले हक्क व हिस्से सौ. प्रमिला सदाशिव निजप यांच्या नावे मुक्त व त्याग केले. पुढे, दिनांक २७ जून २०२४ च्या बक्षिसपत्राद्वारे सौ. प्रमिला सदाशिव निजप यांनी सदर फ्लॅटमधील आपला हक्क, शिर्षक व हितसंबंध हे माझे अशिल श्री. शशांक सुरेश लोणकर यांच्या नावे भेट म्हणून हस्तांतरित केले. आता सौ. कविता सुरेश गावणकर व सौ. लीना संकेत घाडिगांवकर या सदर फ्लॅट श्री. शशांक सुरेश लोणकर यांच्याकडून खरेदी करण्याच्या इराद्यात आहेत.

कोणा व्यक्तिस सदर फ्लॅट किंवा त्याच्या कोणत्याही भागाबाबत इच्छापत्र, न्यायालयीन प्रमाणित इच्छापत्र, विक्री, देवाणघेवाण, गहाणखत, शुल्क, भेटवस्तू, ट्रस्ट, वारसा, ताबा, भाडेपट्टा, उप-भाडेपट्टा, नियुक्ती, हस्तांतरण, वहिवाट, उप-वहिवाट, मृत्युपत्र, उत्तराधिकार, परवाना, देखभाल, प्रलंबित खटला, कर्ज, अग्रिम, धारणाधिकार, तारण, आदेश, कोणत्याही न्यायालयाने दिलेले किंवा जारी केलेले निर्णय किंवा हुकूम, कर किंवा महसूल किंवा वैधानिक अधिकारी, जोडणी, तडजोड किंवा सदर मालमत्तेच्या तारणावर कर्ज देण्यास कोणत्याही व्यक्तीला आक्षेप असेल तर किंवा अन्यथा कसेही याद्वारे कोणताही दावा असल्यास त्यांनी खालील स्वाक्षरीकर्त्यास बी/१०६, १ला मजला, सय्यद मंझिल कोहौसो लिमिटेड, पंडित दिनदयाल नगर, बसिन कॅथोलिक बँक लिमिटेड समोर, माणिकपूर, वसई (पश्चिम), जिल्हा पालघर - ४०१२०२ येथे या तारखेपासून १४ दिवसांच्या आत वैध कागदोपत्री पुराव्यांसह ते लेखी स्वरूपात कळवणे आवश्यक आहे, अन्यथा असे गृहीत धरले जाईल की कोणतेही दावे अस्तित्वात नाहीत आणि ते, जर असतील तर, माफ केलेले किंवा सोडून दिलेले मानले जातील आणि माझे अशिल विक्री व्यवहार पूर्ण करतील.
वसई, आज दिनांकित ०६ मार्च २०२६.

सही/-
डेव्हिड एस. डाबरे
वकील उच्च न्यायालय, मुंबई

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
ई-निविदा सूचना

अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, मंडल कार्यालय सोलापूर यांचेद्वारे बाहयस्त्रोत कंत्राटी कुशल/अर्धकुशल/अकुशल कामगार नेमण्याकरिता नोंदणीकृत व अनुभवी ठेकेदारांकडून निविदा मागविण्यात येत आहे. सदर निविदा म. रा. वि. वि. कं. मर्या., च्या http:/works.mahadiscom.in/e-tender / etender या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. सदरच्या निविदा सोलापूर शहर विभागीय कार्यालय यांचेकरीता निविदा क्र. टी-१५/ /२०२५-२६ अन्वये १ वर्षाच्या कालावधीकरिता मागविण्यात येत आहेत. सदर निविदा उपरोक्त संकेतस्थळावर विक्री करिता दि.०६.०३.२०२६ ते १७.०३.२०२६ या कालावधीत उपलब्ध राहतील. तसेच सदरच्या निविदा भरण्याची अतिंम तारीख दि.१७.०३.२०२६ रोजी १४.०० पर्यत राहील.
टीप : कोणतीही निविदा कारण न दाखवता नाकारण्याचा हक्क खालील सही करणार यांनी राखुन ठेवलेला आहे. निविदा फी ऑन लाईन भरावयाची आहे.

HO PR NO 67/26
dt.05.03.2026

अधीक्षक अभियंता (सोमंका)
मंडल कार्यालय सोलापूर

महाराष्ट्र शासन
जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी यांचे कार्यालय, मुंबई शहर
(जमीन महसूल वसुली शाखा )
खोली क्र. १०३, पहिला मजला, जुने जकात घर, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई-४००००१
दुरध्वनी क्र. २२६६०२३५ E-mail: lrmumbaicity@gmail.com

जाहीर प्रगटन

**अर्जदार :- श्री. सुधाकर यशवंत वीर**
**विरुद्ध**
**गैरअर्जदार :-** वैद्यकीय अधिकारी, मृत्यु नोंदणी, एफ/नॉर्थ वार्ड, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालय, फ्लॅट नं. ९६, भाऊदाजी रोड, माहेश्वरी सर्कलजवळ, ब्राह्मणीवाडा, माटुंगा ईस्ट, मुंबई- ४०००१९.
**बनामः** सर्व नागरीक

अर्जदार यांनी भागीरथी यशवंत वीर यांचा मृत्यु दिनांक ९/०१/२०२३ रोजी मृत्यु ठिकाणः- रूम नं. २२५, संगम नगर, चिखलवाडी, सॉल पेन रोड, ॲन्टॉप हिल, वडाळा, मुंबई ४०००३५ येथे झालेला असल्याने व सदरच्या मृत्युची नोंदणी अभिलेख उपलब्ध नसल्याने व त्यांचा मृत्युची नोंद गैरअर्जदार उपनिबंधक तथा वैद्यकीय अधिकारी, जन्म-मृत्यु नोंदणी विभाग, एफ/नॉर्थ, बृहन्मुंबई महानगरपालिका यांचे कार्यालय, फ्लॅट नं.९६, भाऊदाजी रोड, माहेश्वरी सर्कलजवळ, ब्राह्मणीवाडा, माटुंगा ईस्ट, मुंबई- ४०००१९ यांचे अभिलेखावर घेऊन मृत्यु प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) चे अंतर्गत या कार्यालयात अर्ज सादर केलेला आहे.

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी कोणाचेही हितसंबंध असल्यास अथवा कोणासही आक्षेप/ हरकत घ्यावयाचा असेल तर हा जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्याच्या **तारखेपासुन १५ दिवसाचे** आत किंवा नेमलेल्या तारखेच्या आंत या कार्यालयात हजर होऊन आपली हरकत/ आक्षेप/ म्हणणे लेखी स्वरुपात कळवाव्यात तसेच या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर उपरोक्त मुदतीच्या आत कोणीही योग्य हरकत/ आक्षेप/ म्हणणे दाखल न केल्यास सदरहू कार्यालय अर्जदारास त्यांनी मागणी केलेली मृत्युच्या नोंदणीसाठी केलेला अर्ज लागलीच पुरावा घेऊन अर्ज निकाली काढण्यात येईल, मंजुर/ नामंजुर करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.
**कार्यालयाचा पत्ता :-** तहसिलदार, जमीन महसूल वसुली शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई शहर, १ ला मजला, खोली क्र. १०३, ओल्ड कस्टम हाऊस, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई ४०० ००१

(शीतल देसाई)
तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी,
मुंबई शहर

# गोव्यात होळी अंगावर पडल्याने पोलिसाचा मृत्यू

■ पणजी

**गोव्यातील** डिचोली तालुक्यातील मेणकुरे येथे होळी उभारताना लाकडी खांब अंगावर पडून आयआरबीएन पोलीस हेड कॉन्स्टेबल प्रणव पांडुरंग मिशाळ (४२) यांचा मृत्यू झाला.या घटनेने मेणकुरे गावात शोककळा पसरली आहे. प्रणव हे गोवा पोलिसांच्या सुरक्षा विभागात होते व सरकारी अभियोक्त्यांच्या हाताखाली सेवा बजावत होते. त्यांच्यामागे पत्री, मुलगा,आई,वडील व भाऊ असा परिवार आहे.ते एक चांगले नाट्यकलाकार होते.ते त्यांच्या मेणकुरे गावात होळीसाठी लाकूड उभारण्याचे काम सुरू होते.त्यावेळी अचानक होळीचे लाकूड प्रणव यांच्या अंगावर पडले. त्यात ते गंभीर जखमी झाले.त्यांना तत्काळ गोवा वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले.परंतु उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

# महिन्यानंतरही मणिपूरच्या मुख्यमंत्र्यांना खाते नाही


■ इम्फाळ

**शपथविधी** समारंभानंतर तब्बल एका महिन्याने मणिपूरचे दोन उपमुख्यमंत्री आणि दोन मंत्र्यांना खात्यांचे वाटप करण्यात आले. मुख्यमंत्री युमनम खेमचंद सिंह यांना अद्याप कोणतेही विशिष्ट खाते देण्यात आलेले नाही. कुकी समुदायातील उपमुख्यमंत्री नेमचा किपगेन यांच्याकडे ग्रामीण व पंचायतराज विकास तसेच डोंगरी व आदिवासी व्यवहार विभागाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. दुसरे उपमुख्यमंत्री आणि नागा पीपल्स फ्रंटचे नेते लोसी डिखो यांच्याकडे सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी तसेच वन, पर्यावरण आणि हवामान बदल ही खाती देण्यात आली आहेत. मंत्री गोविंदास कोंथौजाम यांच्याकडे गृहविभागासोबतच युवा व्यवहार आणि क्रीडा विभागाची जबाबदारी देण्यात आली आहे. नॅशनल पीपल्स पार्टीचे नेते के. लोकेन सिंह यांना कला व संस्कृती तसेच पर्यटन खाते देण्यात आले आहे, असेही अधिसूचनेत नमूद आहे. राज्य सरकारमधील एका अधिकाऱ्याने सांगितले की, मार्चच्या दुसऱ्या आठवड्यात होणाऱ्या अर्थसंकल्पीय अधिवेशनानंतर मंत्रिमंडळ विस्तार होण्याची शक्यता आहे.

देश विदेश

# कॅनडामध्ये भारतीय वंशाची युट्युबर नॅन्स ग्रेवालची हत्या

■ ओटावा



**भारतीय** वंशाची सोशन मिडिया इन्फ्लुएन्सर नॅन्सी ग्रेवाल (४५) हिची कॅनडाच्या ओंटारिओ शहरात धारदार शस्त्राचे वार करून हत्या करण्यात आली. लासेल पोलीस या हत्या प्रकरणाचा तपास करीत आहेत. कोणाकडे यासंबंधी कोणतीही माहिती असेल किंवा त्याच्या घराबाहेरील सीसीटीव्ही कॅमेरॅमध्ये काही संशयास्पद हालचाली दिसल्या असतील तर ते फुटेज तपास कामासाठी द्यावे, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. मूळची पंजाबची नॅन्सी सोशल मीडियावर आणि विशेषः युट्युबवर जास्त सक्रिय होती. पंजाबमध्ये घडणाऱ्या अनेक राजकीय घडामोडींवर ती बेधडक मत नोंदवत असे. काही दिवसांपूर्वी तिने तुरुंगात असलेले खासदार अमृतपाल सिंग यांच्यासंबंधी भाष्य केले होते.

# सुदानासह ४ देशांचा यूके शैक्षणिक व्हिसा थांबणार

**लंडन - यूके** सरकार या महिन्यापासून अफगाणिस्तान, कॅमेरून, म्यानमार आणि सुदानमधील विद्यार्थ्यांना शैक्षणिक व्हिसा देणे थांबवणार असून व्हिसाचा व्यापक गैरवापर होत आहे. त्यामुळे ही कारवाई करण्यात येत असल्याचे गृहसचिव शबाना महमूद यांनी सांगितले. शिक्षणासाठी यूकेमध्ये आल्यानंतर ४ देशांतील विद्यार्थी आश्रयासाठी दावा करतात. सरकार व्हिसाच्या गैरवापरावर कडक कारवाई करत आहे.जेणेकरून युके गरजू विद्यार्थ्यांना मदत करण्याची परंपरा कायम ठेवू शकेल,असे त्यांनी सांगितले. युके सरकारने आपल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटले की,२०२१ ते २०२५ मध्ये युकेमध्ये शैक्षणिकसाठी आलेल्या विद्यार्थ्यांचे आश्रयाचे दावे तिप्पट झाले आहेत.

# प्रवीण शेट्टी स्थायी समिती सभापती
## भाजपाचा अर्ज मागे! बिनविरोध निवड

■ वसई

**वसई-विरार** महापालिकेच्या स्थायी समिती सभापतीपदी प्रवीण शेट्टी यांची बिनविरोध निवड झाली. भाजपाच्या निलेश चौधरी यांनी ऐनवेळी अर्ज मागे घेतल्याने ही निवडणूक बिनविरोध झाली.

आज पालिका मुख्यालयात सभापती निवड प्रक्रिया पार पडली. यावेळी पालघर जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी डॉ इंदूराणी जाखड पिठासीन अधिकारी म्हणून उपस्थित होत्या. स्थायी समितीत एकूण १६ सदस्य असून त्यात बविआचे १० आणि भाजपच्या ६ सदस्यांचा समावेश आहे. बविआतर्फे प्रवीण पाटील यांनी तर भाजपतर्फे निलेश चौधरी यांनी अर्ज भरला होता. मात्र ऐनवेळी चौधरी यांनी अर्ज मागे घेतल्याने शेट्टी यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यासाठी आली. पुढील १ वर्षासाठी ही निवड करण्यात आली आहे. प्रवीण शेट्टी हे ९ वे स्थायी समिती सभापती ठरले आहे. यापूर्वी त्यांनी उपनगराध्यक्ष तसेच वसई-विरार महापालिकेचे महापौरपद भूषवले आहे. त्यांची नुकतीच गटनेतेपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

# ५० किलो मर्यादेवर माथाडी ठाम
## नवी मुंबईत कांदा-बटाटा बाजार ठप्प

■ नवी मुंबई

**माथाडी** कामगारांच्या आंदोलनामुळे कृषी उत्पन्न बाजार समिती (एपीएमसी)च्या नवी मुंबई येथील बाजारपेठेत कांदा-बटाटा बाजारातील व्यवहार विस्कळीत झाले. कांदा-बटाट्याच्या गोण्यांचे वजन ५० किलोपेक्षा जास्त असल्याने त्या उचलण्यास माथाडी कामगारांनी नकार दिला. एपीएमसी बाजारात दररोज मोठ्या प्रमाणात कांदा-बटाट्याची आवक होत असते. मात्र गेल्या काही दिवसांपासून गोण्यांच्या वजनाच्या मुद्द्यावरून व्यापारी आणि माथाडी कामगारांमध्ये वाद निर्माण झाला आहे. राज्य शासनाने कामगारांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने कृषीमालाच्या गोणीचे कमाल वजन ५० किलो ठेवण्याचा निर्णय घेतला. तरीही प्रत्यक्ष व्यवहारात अनेक ठिकाणी ६० ते ७० किलो वजनाच्या गोणी बाजारात येत असल्याचा आरोप माथाडी कामगारांनी केला.

## नवी मुंबई महानगरपालिका

शहर अभियंता विभाग

फेरनिविदा सुचना नमुंमपा /शहर अभियंता विभाग/ 476 /2025-26

कामाचे नाव :- नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विभागनिहाय पारंपारिक स्मशानभुमीचे Hybrid Crematorium मध्ये रुपांतर करणे..

अंदाजपत्रकिय रक्कम (रु.) :- 2,43,86,813/-

निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-Tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.06/03/2026 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचे आहे. ई-निविदा ई-टेंडरिंग (E-Tendering) प्रकियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणीसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबरवर संपर्क करावे.

कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकरण्याचा अधिकार मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखून ठेवलेला आहे.

सही/-
शहर अभियंता
नवी मुंबई महानगरपालिका

जाक्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/161/2025

## श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

मु. पो. शिर्डी ता. राहाता जि. अहिल्यानगर पिन - ४२३ १०९
दूरध्वनी क्र. (०२४२३) (ऑपरेटर) - २५८५००
श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था विभाग- (०२४२३)- २५८८५८/६१
Website- www.sai.org.in, E-mail-saibabaiti22@gmail.com

### जाहीर ई-निविदा सूचना

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था विभागासाठी विविध ट्रेडकरीता मशिनरी पुरवठा करणेकामी पुरवठादारांकडून ऑनलाईन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

१. ई-निविदाचे निकष, अटी/ शर्ती व ई-निविदेच्या माहितीसाठी श्री साईबाबा संस्थानचे www.sai.org.in/tender या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी.
२. सदर ई-निविदा ऑनलाईन डाऊनलोड व अपलोडींगसाठी दि. ०६/०३/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजेपासून ते दि. २४/०३/२०२६ सायं. ०५:०० वा. पर्यंत http://www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध राहील.

सही/-
गोरक्ष गाडीलकर, भा. प्र.से.
मुख्य कार्यकारी अधिकारी

क्रमांक : आरओसी-२०२५-२६/क्र-५/सी ६३४८

# होळीसाठी सुपारीचे झाड लोकलच्या दाराला बांधले! ६ जणांविरोधात गुन्हा

■ मुंबई

**मुंबईत** होळीच्या परंपरेतून विरारहून माहीमकडे जाताना काही प्रवाशांनी लोकल ट्रेनच्या दरवाजाला सुपारीचे झाड आडवे बांधले. या प्रकारामुळे इतर प्रवाशांच्या सुरक्षेला धोका निर्माण झाल्याने रेल्वे प्रशासनाने तत्काळ कारवाई करत सहा जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. विरार आणि माहीम यांना जोडणारी ही होळीची परंपरा ब्रिटिश काळापासून सुरू असल्याचे सांगितले जाते. माहीममधील मोरी रोड परिसरात पूर्वी कोळी समाजाच्या अनेक चाळी होत्या. पुनर्विकासानंतर या भागातील अनेक कुटुंबे विरारमध्ये स्थायिक झाली. मात्र, सांस्कृतिक नाते जपण्यासाठी दरवर्षी विरारहून माहीमला होळी साजरी करण्यासाठी ते येतात. ढोल-ताशे, नृत्य आणि 'होळी माते की जय' असा जयघोष करत लोकलने प्रवास करत मोरी रोड परिसरात होलिका दहनाचा विधी पार पडतो. परंपरागत पद्धतीने अशी होळी साजरी करण्यासाठी रविवारी रात्री विरारमधून माहीमकडे जाणार्या काही जणांनी या प्रवासादरम्यान लोकलच्या दरवाजाला सुपारीचे झाड बांधून आडवे बांधून इतर प्रवाशांची वाट अडवली.

## जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी,

प्रशासकीय इमारत, ९ वा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
E-Mail Id :- deomsd23@gmail.com

क्र. निवडणूक/ मुंउजि/का-१२ B/ई-निविदा/२०२६, दिनांक :- ०४/०३/२०२६

### ई-निविदा सूचना

जिल्हाधिकारी कार्यालय (मुख्यालय), तसेच जिल्हयातील २६ - विधानसभा मतदार संघ अथवा जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर तथा अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी आदेश देतील त्या ठिकाणी संगणक संच व इतर अनुषंगिक साहित्य भाडेतत्वावर पुरवठा करणेकरिता ई-निविदा प्रणालीद्वारे निविदा मागवित आहेत.

सदर ई-निविदा www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येत आहे.

**कामाचे नाव:-** मुंबई उपनगर जिल्हा - अभिकर्त्यांकडून भाडेतत्वावर संगणक संच व इतर अनुषंगिक साहित्य पुरवठा करणेसाठी ई-निविदा.

**निविदा बाबत आवश्यक बाबी :-**

१) सदर कामासंदर्भातील आवश्यक अटी व शर्ती तसेच निविदा दाखल करण्याचे वेळापत्रक इत्यादी माहिती www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
२) निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारांनी क्लास III डिजिटल सिग्नेचर आणि वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नावनोंदणी करुन घ्यावी.

सही/-
(सौरभ कटियार)
जिल्हाधिकारी मुंबई उपनगर तथा
अतिरिक्त जिल्हा निवडणूक अधिकारी

क्रमांक: आरओसी- २०२५-२६/क्र. ५/सी ६३६१

**दिंडोशी येथील मुंबई शहर दिवाणी न्यायालय**
**बोरिवली विभागामध्ये**
**एस. सी. खटला क्रमांक ३०४९ वर्ष १९९५**
**मध्ये**
**दरखास्त/अंमलबजावणी अर्ज**
**क्रमांक १०९ वर्ष २०२५**

**श्रीमती सिसिली वर्गीस कदमथोट्टू** )
मुंबईतील भारतीय रहिवासी )
राहणारे ५९, ग्रेट वेस्टर्न )
इमारत, महाराष्ट्र चेंबर ऑफ )
कॉमर्स लेन, फोर्ट, मुंबई - ४०० ०२३ )
...वादी/डिक्रीधारक

**विरुद्ध**
१. श्री. रमणलाल जयशंकर त्रिवेदी )
(दिवंगत) सज्ञान, भारतीय रहिवासी )
राहणार - त्रिवेदी बिल्डिंग, वल्लभभाई रोड, )
विलेपार्ले (पश्चिम), मुंबई - ४०० ०५६ )
१(अ) अतुल त्रिवेदी )
कर्ता "श्री हिम्मतलाल जीशंकर त्रिवेदी )
हिंदू अविभक्त कुटुंब", )
राहणार त्रिवेदी बिल्डिंग, वल्लभभाई रोड )
विलेपार्ले (पश्चिम), मुंबई - ४०० ०५६ )
१(ब) श्री पिरामल आर. त्रिवेदी )
श्री रमणलाल जयशंकर त्रिवेदी )
हिंदू अविभक्त कुटुंब यांचे कर्ता )
१ (क) डॉ. सौरभी आर. त्रिवेदी, वय अज्ञात )
१ (ड) श्रीमती पूर्णिमा दवे, वय अज्ञात )
१ (ई) श्री कनक आर. त्रिवेदी, वय अज्ञात )
१ (फ) श्री. कश्यप आर. त्रिवेदी, वय अज्ञात )
सर्व भारतीय रहिवासी, राहणार १ला मजला )
खोली क्रमांक २, त्रिवेदी इमारत )
लक्ष्मी नारायण मंदिर जवळ, अंसारी रोड, )
विलेपार्ले (पश्चिम), मुंबई - ४०० ०५६. )
दिवंगत प्रतिवादी क्रमांक १ चे )
कायदेशीर वारस आणि प्रतिनिधी )
२. श्रीमती सुषमा वीरेंद्रपाल वर्मा )
मुंबई येथील भारतीय रहिवासी )
सुषमा बिल्डर्स या नाव आणि शैलीमध्ये )
बिल्डर म्हणून व्यवसाय )
कार्यालयाचा पत्ताः एस्प्लेनेड मॅन्शन )
खोली क्रमांक ३, एम. जी. रोड, )
मुंबई - ४०० ०२३. )
...प्रतिवादी / निवाडा ऋणको

नोंद घ्यावी की, सदर माननीय न्यायालय **दि. १३ मार्च २०२६ रोजी दुपारी २.४५ वाजता किंवा त्यानंतर लगेचच** वर उल्लेखित वादी/डिक्रीधारक यांच्याद्वारे न्यायालय कक्ष क्रमांक १ मध्ये पिठासीन एस. एस. गोसावी यांच्या समक्ष खालील दिलाशांकरिता नेण्यात येईल:
(i) दावा मालमत्ता सदनिका क्र. २५ (नवीन क्रमांक ५०३), ५वा मजला, इमारत क्र. २, राधा क्रिष्णा नगर, मोगरा गाव, अंधेरी पूर्व, मुंबई व त्यासह पार्किंग लॉटच्या संदर्भात डिक्री धारक/ वादी यांच्या नावे विक्रीकरिता करारपत्र (वादीकरिता परिशिष्ट ' I येथे संलग्न आणि येथे संलग्न मसुदा, योग्यरित्या सुधारित, नुसार) बनविणे आणि नोंदणी करणे याकरिता न्यायालयाचा अधिकारी किंवा अन्य कोणी योग्य आणि उचित व्यक्तीची नियुक्ती करण्याकरिता;
(ii) दावा मालमत्तेचा डिक्री धारक/वादी यांना विक्री करारपत्र बनविल्यानंतर आणि नोंदणीनंतर प्रत्यक्ष ताब्याचे वॉरंट किंवा प्रत्यक्ष ताबा देण्याकरिता कोर्ट रिसिव्हर, मुंबई उच्च न्यायालयाचे निर्देश जारी करणे.
माझ्या सहीनिशी आणि सदर माननीय न्यायालयाच्या शिक्क्यानिशी पारित.

दिनांक २ मार्च २०२६

सही/-
निबंधक करिता
शहर दिवाणी न्यायालय दिंडोशी

शिक्केदार

दि. २ मार्च, २०२६
सही/-
**श्री. अरुण पणिकर**
वादी/डिक्रीधारकाचे ॲडव्होकेट
चेंबर क्र. १, चौथा मजला
१६, होमी मोदी स्ट्रीट
बॉम्बे हाऊसजवळ
मुंबई - ४०० ०२३.

## गो एअरलाईन्स (इंडिया) लिमिटेड (परिसमापनात)

द्वारा- ब्रिटानिया इंडस्ट्रीज लिमिटेड, ए-३३, लॉरेन्स रोड इंडस्ट्रियल एरिया, नवी दिल्ली डीएल ११००३५ भारत
सीआयएन: U63013DL2004PLC217305
(माननीय एनसीएलटीच्या २० जानेवारी २०२५ च्या आदेशानुसार परिसमापन अंतर्गत असलेली कंपनी)

ई-लिलावासाठी जाहीर घोषणा
नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ अंतर्गत सूचना

**गो एअरलाईन्स (इंडिया) लिमिटेडच्या (परिसमापनात)** मालकीच्या मालमत्तेच्या (खालील तक्त्यात वर्णन केलेल्या) विक्रीसाठी निविदा मागवल्या जात आहेत, जी **गो एअरलाईन्स (इंडिया) लिमिटेडच्या (परिसमापनात)** परिसमापन इस्टेटचा भाग आहे, नादारी आणि दिवाळखोरी संहिता, २०१६ (आयबीसी) च्या तरतुदींनुसार सहवाचिता त्याअंतर्गत तयार केलेल्या नियम आणि विनियमनानुसार, 'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे', 'जसे आहे ज्या स्थितीत आहे', 'जे काही आहे ते', 'कोणत्याही आधाराशिवाय', कोणत्याही प्रतिनिधित्वाशिवाय, हमी किंवा नुकसानभरपाईशिवाय.
ही विक्री अधोस्वाक्षरीकर्त्यांकडून बान्कनेट (पूर्वी ईबिक्री) https://ibbi.baanknet.com या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे केली जाईल. **(ई-लिलाव प्लॅटफॉर्म)**

| ई-लिलावासाठी महत्त्वाच्या तारखांची अनुसूची | |
|---|---|
| पात्रता कागदपत्रे आणि कलम २९ए हमीपत्र सादर करण्याची शेवटची तारीख आणि वेळ | ०३ एप्रिल २०२६ |
| इसारा रक्कम ठेव (इरठे) जमा करण्याची शेवटची तारीख आणि वेळ | ०४ एप्रिल २०२६ |
| ई-लिलावाची तारीख आणि वेळ | ०६ एप्रिल २०२६ दु.१२:०० ते १८:३० पर्यंत |
| अंतिम विक्री मोबदल्याची रक्कम भरण्याची शेवटची तारीख | लिलाव प्लॅटफॉर्मवर उपलब्ध असलेल्या मालमत्ता विक्री प्रक्रिया दस्तऐवज (एएसपीडी) नुसार |

| अ. क्र. | मालमत्तेचे वर्णन | ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर मालमत्ता आयडी | आरक्षित मूल्य (रु.मध्ये) | इसारा रक्कम ठेव (रु.मध्ये) | वाढीव मूल्य (रु.मध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १. | ०४ एपीयू - दिल्ली | ३७९२ | १०,४३,००,००० | १,०४,३०,००० | १०,००,००० |
| २. | इनलेट काउल - दिल्ली | ३७२५ | ३,७३,००,००० | ३७,३०,००० | ५,००,००० |
| ३. | ०१ एपीयू- लिथुआनिया (युरोप) | ३७९० | २,२२,३९,१२७ | २२,२३,९१३ | ५,००,००० |
| ४. | एअरक्राफ्ट केबिन केटरिंग ट्रॉलीज आणि इन्व्हेंटरी | ३३१० | १,२४,९२,०१४ | १२,४९,२०१ | ३,००,००० |
| ५. | रॅडोम्स | ३७९१ | ४२,६६,४८७ | ४,२६,६४९ | १,००,००० |
| ६. | टाटा इंडिका | ३३०९ | ५७,०३८ | ५,७०४ | ५,००० |

*विक्री पूर्ण करण्यासाठी इतर कर, आकारणी, प्रभार, शुल्क, हस्तांतरण शुल्क, मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क, प्रीमियम आणि सर्व लागू आवश्यक खर्च वगळता. खालील स्वाक्षरीकर्त्याकडून कोणतेही प्रतिनिधित्व, हमी आणि नुकसानभरपाई दिली जाणार नाही.

**महत्त्वाच्या सूचना:**
१. वर सूचीबद्ध केलेल्या ०६ मालमत्तांसाठी ई-लिलाव वैयक्तिकरित्या आयोजित केले जातील.
२. ही विक्री सूचना संबंधित मालमत्ता विक्री प्रक्रिया दस्तऐवज (एएसपीडीएस) सोबत वाचली जाईल ज्यामध्ये आयबीसी च्या कलम २९ए अंतर्गत पात्रतेसाठी मालमत्ता, घोषणा, शपथपत्रे आणि उपक्रमांचे तपशील आणि 'ई-लिलाव विक्रीच्या सामान्य आणि तांत्रिक अटी आणि शर्ती' समाविष्ट असतील, जे **बान्कनेट** या लिंकवर उपलब्ध आहेत.
३. संभाव्य बोलीदारांनी आवश्यक पात्रता कागदपत्रे आणि इरठे ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे निर्धारित वेळेत सादर करावेत.
४. संभाव्य बोलीदारांनी अशी हमी सादर करावी की त्यांना आयबीसीच्या कलम २९ए अंतर्गत लागू असलेल्या मर्यादेपर्यंत कोणत्याही अपात्रतेचा सामना करावा लागत नाही आणि कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळल्यास, इरठे जप्त केली जाईल.
५. ई-लिलावाबाबत कोणत्याही प्रश्नांसाठी कृपया (+९१-८४२२८८४७५८) वर संपर्क साधा आणि गो एअरलाईन्स (इंडिया) लिमिटेड: मालमत्ता विक्री या विषयासह gofirstauction@gmail.com वर संपर्क साधा.
६. हे स्पष्ट करण्यात येते की ही सूचना विक्री करण्यासाठी अधोस्वाक्षरीकृत किंवा गो एअरलाईन्स (इंडिया) लिमिटेड (परिसमापनात) यांच्याकडून कोणत्याही प्रकारचे बंधनकारक बंधन निर्माण करत नाही. अधोस्वाक्षरीकृत यांनी घेतलेला कोणताही निर्णय अंतिम असेल आणि सर्व संभाव्य बोलीदारांवर बंधनकारक असेल.

सही/-
गो एअरलाईन्स (इंडिया) लिमिटेडचे
परिसमापक दिनकर टी. वेंकटसुब्रमण्यम
आयपी नोंदणी क्र.: IBBI/IPA-001/IP-P00003/2016-17/10011
पत्रव्यवहाराचा पत्ता: येसवर्क्स स्पेस प्रायव्हेट लिमिटेड
एस१३-एस१४, २रा मजला पिनॅकल बिझनेस पार्क
शांती नगर, महाकाली केव्हज रोड,
अंधेरी पूर्व, मुंबई - ४०० ०९३
लिलाव प्रक्रिया ईमेल - gofirstauction@gmail.com

ठिकाण: नवी दिल्ली
दिनांक: ०६ मार्च २०२६

## purple FINANCE

**कार्यालय:** पर्पल फायनान्स लिमिटेड, ७०५/७०६, ७ वा मजला, हॉलमार्क बिझनेस प्लाझा, संत ज्ञानेश्वर मार्ग, वांद्रे (पश्चिम), मुंबई-४०००५१.
**दूरध्वनी:** ०२२-६९१६५१२३, **वेबसाइट:** www.purplefinance.in

### ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)

ज्याअर्थी, **पर्पल फायनान्स लिमिटेड (पीएफएल)** चे अधिकृत अधिकारी म्हणून, अधोस्वाक्षरीकृत व्यक्तीने सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट *(कायदा), २००२ (५४/२००२) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या कलम १३(१२) सहवाचिता नियम ९ अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करून, कर्जदार आणि सह-कर्जदारांना सूचनेत नमूद केलेली रक्कम आणि त्यावरील व्याज ही सूचना मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत परत करण्याचे आवाहन करणारी **मागणी सूचना** जारी केली. कर्जदार रक्कम परत करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदाराला आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, खाली स्वाक्षरीकर्त्याने सदर नियमांच्या नियम ९ सहवाचिता सदर *(कायदा) च्या कलम १३(४) अंतर्गत त्यांना/तिला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा **सांकेतिक** ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदारांना आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे इशारा देण्यात येतो की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी संबंधित कोणत्याही व्यवहारासाठी पर्पल फायनान्स लिमिटेडकडून संबंधित प्रत्येक मालमत्तेसाठी खाली नमूद केल्याप्रमाणे शुल्क आकारले जाईल:

| अ. क्र. | कर्जदार आणि सह-कर्जदाराचे नाव/कर्ज खाते क्र./शाखा | ज्या प्रतिभूत मालमत्तेवर स्वारस्य निर्माण झाले आहे त्या मालमत्तेचे वर्णन | पाठवलेली मागणी सूचना दिनांक आणि थकबाकी रक्कम | ताबा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १. | १. भारती महेश गोडांबे (कर्जदार) २. महेश हरिचंद्र गोडांबे (सह-कर्जदार) कर्ज खाते क्र.: पीएफएलएसएल व्हीआयआर०००१००० शाखा : कल्याण | ग्रामपंचायत घर क्र.२९७, मोजमाप सुमारे ९०० चौ.फूट, गाव कळंभे, तालुका मुरबाड, आणि जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१४०१ येथे स्थित. **चतुसिमाः पूर्व-** श्री. बंडू सहाजी गोडांबे यांचे घर, **पश्चिम-** श्री.काशिनाथ बाकू यांचे घर, **दक्षिण-** ग्रामपंचायत रोड अंतर्गत, **उत्तर-** खुला भूखंड | ११.१२.२०२५ आणि रू.३६०५८०/- | ०४.०३.२०२६ |

**दिनांक: ०६.०३.२०२६, ठिकाण: ठाणे** — **सही/- प्राधिकृत अधिकारी पर्पल फायनान्स लि.**

## ठाणे महानगरपालिका, ठाणे

सार्वजनिक बांधकाम विभाग
निविदा सूचना

ठाणे महानगरपालिका हद्दीतील कळवा प्रभाग समिती क्षेत्रातील "आमदार निधी" या लेखाशिर्षका अंतर्गत गटार व पायवाट करणे अशा दोन कामांकरीता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. सविस्तर निविदा सूचना व निविदा प्रपत्र संकेत स्थळ https:/mahatendrs.gov.in वर दि. ६.३.२०२६ ते दि. १३.३.२०२६ पर्यंत उपलब्ध असतील. सदर निविदा ई टेंडरींग पध्दतीने दि. १३.३.२०२६ रोजी १६.०० वाजता स्विकारण्यात येतील. प्राप्त निविदा शक्य झाल्यास दि. १६.३.२०२६ रोजी १६.०० वाजता उपस्थित निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील. कोणतीही एक अथवा सर्व निविदा कोणतेही कारणे न दाखविता नाकारणेचा अधिकार महापालिका आयुक्त यांनी राखून ठेवला आहे.

ठामपा/पिआरओ/पिडब्ल्यूडी-क.प्र.स/१२५७/२०२५-२६ सही/-
दि.०५.०३.२०२६ कार्यकारी अभियंता
**plsvisitourofficialweb-site** ठाणे महानगरपालिका, ठाणे
**www.thanecity.gov.in**

**मालमत्ता कर वेळेत भरा...कारवाईची अप्रिय घटना टाळा !**

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that **M/S. SHREE SAVALIYA HOMES LLP** through its Partner**- MR. ROSHAN MALOO** (the "Owner"), has agreed to sell to our clients, their right, title and interest in the property more particularly described in the Schedule hereunder written.

**THE SCHEDULE HEREINABOVE REFERRED TO:**

ALL THAT pieces and parcels of land bearing Survey No.40, Hissa No.1/2/1, admeasuring 3339 sq. mtrs. or thereabout, corresponding to C.T.S. No.285 (part) of Village Gorai, Taluka Borivali, in the Registration District Mumbai and Sub-District Mumbai Suburban and within the limit of the Mumbai Municipal Corporation (hereinafter referred to as "The said land").

Any person claiming or having any such document or share, right, title, interest, claim or demand whatsoever to or in respect of the said land or any part thereof, whether by way of sale, conveyance, ownership, transfer, assignment, exchange, charge, encumbrance, tenancy, sub-tenancy, lease, sub-lease, license, mortgage, inheritance, gift, lien, maintenance, bequest, easement, trust, possession, notice, or otherwise of any nature whatsoever, are hereby required to make the same known in writing to the undersigned at the within mentioned address, within **15 days** from the date of publication of this notice hereof, with notarized documentary evidence, failing which such claim or objection, if any, shall be deemed to have been waived and/ or abandoned and the sale will be completed without reference to the same.

**Place: Mumbai,**
**Date: 6-3-2026.**

**Sd/-ANUJ Y. RAVAL-Advocate, High Court,**
**C-101, Anshul Plaza C.H.S.L, Near Shiv Temple,**
**Mahavir Nagar, Off Link Road, Kandivali (West), Mumbai-67.**
**Contact: 7303170008, Email: camcons@gmail.com**

### जाहीर नोटीस

याद्वारे जाहीर नोटीस देण्यात येते की, माझ्या अशील सौ. सुधाराणी श्रीनिवास रेड्डी या पंजानी इंडस्ट्रियल इस्टेट, सध्या ज्यास पंजानी इंडस्ट्रियल प्रिमायसेस को-ऑपरेटिव्ह प्रिमायसेस सोसायटी लि. असे संबोधले जाते (नोंदणी क्र. TNA/GNL/305 दि. 15-02-1979), इमारत क्र. 2 मधील भुईमजल्यावरील गाळा/युनिट क्र. 12, क्षेत्रफळ 1040 चौ. फूट (कार्पेट एरिया), खरेदी करण्याचा मानस व्यक्त करीत आहेत. सदर इमारत ही नवीन सर्व्हे क्र. 114/अ/1/1/ड (जुना सर्व्हे क्र. 114/अ/1 पैकी व सर्व्हे क्र. 114/अ/4 पैकी) या जमिनीच्या तुकड्यावर बांधलेली असून, मौजे पांचपाखाडी, खोपट, पोखरण रोड क्र. 1, ता. व जि. ठाणे, ठाणे महानगरपालिका हद्दीत स्थित आहे.

तसेच प्रत्येकी रु. 50/- किंमतीचे 10 शेअर्स, डुप्लिकेट शेअर सर्टिफिकेट क्र. 212 (शेअर्स क्र. 151 ते 160) जे संबंधित सोसायटीने जारी केलेले आहेत, तसेच त्यासंबंधित सर्व हक्क, श्री. सतीशचंद्र पांडे यांनी बोनाफाईड सभासद म्हणून 24-11-2004 रोजी नोंदविलेल्या पार्टीशन करारनाम्याद्वारे (Sr. No. TNN1-06556/2004) तसेच मा. मुंबई उच्च न्यायालय येथील दावा क्र. 1564/1993 मधील संमती अटींच्या आधारे वारसाहक्काने प्राप्त केलेले आहेत.

स्व. सौ. ज्योत्सना सतीशचंद्र पांडे व/किंवा स्व. कु. संजना सतीशचंद्र पांडे यांचे कायदेशीर वारस असल्याचा दावा करणाऱ्या अथवा सदर गाळा/युनिट किंवा त्यातील कोणत्याही भागावर वारसा, भाडेकरार, परवाना, गहाण, विक्री, हस्तांतरण, नियुक्ती, देवाण-घेवाण, भेट, जप्तीहक्क, भाडेपट्टा, तारण, विश्वस्त हक्क, बोजा, देखभाल, ताबा, वहिवाट हक्क (Easement) किंवा इतर कोणत्याही प्रकारे दावा/हक्क सांगणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने/व्यक्तींनी, सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (14) दिवसांच्या आत खाली दिलेल्या पत्त्यावर सर्व संबंधित कागदपत्रांसह लेखी स्वरूपात आपला दावा कळवावा.अन्यथा, नमूद कालावधीत कोणताही दावा प्राप्त न झाल्यास, विक्री/हस्तांतरण प्रक्रिया अशा दाव्यांचा विचार न करता पूर्ण करण्यात येईल आणि असे दावे, असल्यास, त्याग (Waived) मानले जातील.

दिनांक : ०६/०३/२०२६
पत्ता : ५ए, मेघदूत धारा सीएचएस लि.,
रामबागलेन क्र. ४, कल्याण(पश्चिम)-४२१३०१.

सही/-
ॲड. अमित सुहास गडकरी
मोबाईल नं. ९८१९२४०७४७
ईमेल: gadkarilaw@hotmail.com

### जाहीर सूचना

लक्षात असावे की, अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या मालमत्तेचे शिर्षक, हक्क, दावे, हितसंबंध यांची मी चौकशी करत आहे आणि म्हणूनच जनतेला सूचना देण्यात येते की माझे अशिल मे. ए बी कॉन्ट्रॅक्टर्स ॲण्ड डेव्हलपर्स विकास करारात नमूद केलेल्या अटी आणि शर्तींवर सदर मालमत्तेचा पुनर्विकास करण्याचा विचार करीत आहेत.

कोणत्याही व्यक्ती / भागीदारी फर्म / एलएलपी फर्म / कंपनी / मालकी हक्काची आस्थापना यांना अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या सदर मालमत्तेबाबत विकास करार, मुखत्यारपत्र/ सामंजस्य करार, नियुक्तीपत्र, विक्री, गहाणखत, भाडेपट्टा, धारणाधिकार, ताबा, बोजा, शुल्क किंवा कोणत्याही इतर प्रकारे कोणताही हक्क, शिर्षक किंवा हितसंबंध असल्यास किंवा असल्याचा दावा करीत असल्यास, त्यांनी या सूचनेच्या प्रसिद्धीपासून १० दिवसांच्या आत, संबंधित कागदपत्रांसह, खाली सही करणाऱ्या वकिलांना त्यांच्या कार्यालयाच्या पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे, अन्यथा, असे गृहीत धरले जाईल की कोणत्याही व्यक्ती / भागीदारी फर्म / एलएलपी फर्म / कंपनी / मालकी हक्काची आस्थापना यांना कोणताही दावा नाही अथवा असल्यास तो त्याग करण्यात आलेला आहे, आणि त्यानुसार मी माझ्या अशिलांना सदर मालमत्तेबाबत शिर्षक प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करीन.

**वर नमूद मालमत्तेची अनुसूची**

सागर सीमा कोहौसोलि म्हणून ज्ञात जमिनीचा आणि इमारतीचा तो सर्व भाग व खंड ज्याचा नोंदणी क्र.बीओएम/एचएसजी/पी/८६४९/१९८३ आहे आणि ज्याचा पत्ता आझाद इमारत, साईबाबा पार्क, एव्हरशाईन नगर, मालाड (पश्चिम), मुंबई - ४०० ०६४, सीटीएस क्र.३०७/९०, प्लॉट क्र.३८, गाव - वलनई, एमएसडी, ज्यामध्ये जी+४ वरचे मजले आणि १० सदस्य आहेत.

**दिनांक: ०६.०३.२०२६**

**सही/-**
**ॲड. महेंद्र कदम**
**सी/०३, भक्ती पॅलेस कोहौसोलि, कांदरपाडा, लिंक रोड,**
**दहिसर (पश्चिम), मुंबई-४०००६८**

### ई-लिलाव विक्री सूचना
### विंडल्स ऑटो प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये)

(सीआयएन - U50101MH1990PTC056302)
नोंदणीकृत कार्यालय: युनिट क्र. ५/बी, ५वा मजला, गोल्डलाईन बिझनेस सेंटर, चिंचोळी अग्निशमन दलाजवळ, लिंक रोड, मालाड (प), मुंबई, महाराष्ट्र, भारत, ४०००६४.

नादारी आणि दिवाळखोरी संकेत, २०१६ ("संकेत") अंतर्गत माननीय एनसीएलटी, मुंबई खंडपीठाद्वारे सी.पी.(आयबी)/५०३(एमबी-IV)/२०२१ मधील आयए-९८(एमबी-IV)/२०२४ मधील आदेश दिनांक ०९.१२.२०२४ नुसार नियुक्त परिसमापकांद्वारे प्रस्तावित, परिसमापन प्रक्रिया विनियमनाच्या विनियमन ३३ सह वाचावयाच्या आयबीसी २०१६ च्या कलम ३५(एफ) अन्वये परिसमापन संपत्तीचा भाग असणाऱ्या कॉर्पोरेट ऋणको, विंडल्स ऑटो प्रायव्हेट लिमिटेड (परिसमापनामध्ये) च्या संपत्तीची विक्री. बोली ऑनलाईन ई-लिलाव सेवा प्रदाता ई-बीक्रय लिस्टींग आणि लिलाव पोर्टल यांच्यामार्फत https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi द्वारे आयोजित करण्यात येतील.

| मालमत्तेचे तपशील | राखीव किंमत (रक्कम भारतीय रु.मध्ये) | सुरुवातीची इसारा रक्कम अनामत (रक्कम भारतीय रु.मध्ये) | विस्तार मूल्य (रक्कम भारतीय रु.मध्ये) |
|---|---|---|---|
| भारतीय नादारी आणि दिवाळखोरी मंडळ (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६ च्या विनियमन ३२ च्या खंड (ब) आणि (क) नुसार, स्लम्प सेल/एकत्रितरित्या मालमत्तांची विक्री आधारावर कॉर्पोरेट ऋणकोच्या मालमत्तांची विक्री. **लिलावाचा दिनांक आणि वेळ: दि. ०३.०४.२०२६ (शुक्रवार) दु. ०२.३० ते दु. ३.३० (दु. ०४.०० वा. पर्यंत ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह)** | | | |
| लॉट १ प्लॉट क्रमांक २४अ, सेक्टर-११, टाटा मोटर्स व्हेंडर पार्क, आयआयई सिडकुल, पंतनगर, परगणा रुद्रपूर, गाव कल्याणपूर, ता.-किच्छा, जि.: उधम सिंह नगर, उत्तराखंड- २६३१५३ येथे स्थित औद्योगिक जमीन, मोजमाप अदमासे ८१५७.३३ चौ. मी. मधील भाडेपट्टा हक्कांमधील प्लान्ट आणि मशिनरीसह प्रतिभूती आणि वित्तीय मालमत्ता आणि जमीन आणि कारखाना इमारतीसह स्लम्प सेल आधारावर कंपनीची विक्री. व त्यासह, सदर भूखंड मोजमाप अदमासे २७१२.७८ चौ.मी. वर बांधलेल्या इमारती आणि संरचना | भारतीय रु. ४,४१,८१,०००/- | भारतीय रु. ४४,१८,०००/- | भारतीय रु. ३,००,०००/- |
| लॉट २ लिंक रोड, चिंचोळी अग्निशमन दलाजवळ, मालाड (पश्चिम), मुंबई - ४०००६४, महाराष्ट्र येथील अ.क्र. ४३७, हिस्सा क्र. २, सीटीएस क्र. १०१६ धारण केलेल्या भूखंडावरील गोल्डलाईन बिझनेस सेंटर या इमारतीमधील ५ व्या मजल्यावरील युनिट क्र. ५बी, मोजमाप १,९०५ चौ.फू. येथे स्थित प्लान्ट आणि मशिनरीसह वाणिज्य युनिट व त्यासह इमारतीच्या जागेमधील २ खुल्या कार पार्किंग जागांची विक्री | भारतीय रु. ३,३१,७२,०००/- | भारतीय रु. ३३,१७,०००/- | भारतीय रु. २,००,०००/- |

**महत्त्वाच्या टिपा:**
१. प्रत्येक किंवा सर्व लॉट्सकरिता स्वतंत्र ईएमडीच्या सादरीकरणानंतर बोली लावण्याची परवानगी मिळेल.
२. संबंधित लॉट्समधील उच्चतम बोलीदारांना यशस्वी बोलीदार म्हणून घोषित करण्यात येईल.
३. विक्री "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे आहे", "ते जे आहे", "तेथे जे आहे" आणि "कोणत्याही आधाराशिवाय तत्त्वावर" करण्यात येईल आणि तसेही, विक्री कोणत्याही प्रकारच्या हमी आणि नुकसान भरपाईशिवाय असेल.
४. प्रक्रियेचे तपशील आणि पात्रता दस्तऐवज सादरीकरणाकरिता वेळापत्रक, व्हीडीआर प्राप्त करणे, साईटला भेट, योग्य चौकशी, इ. नमूद केलेल्या ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवजासह विद्यमान विक्री सूचना वाचावयाची आहे. सदर ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवज ई-लिलाव सेवा प्रदाता **ई-बीक्रय लिस्टींग आणि लिलाव पोर्टलची** वेबसाइट https://ibbi.baanknet.com/eauction-ibbi वर दि. ०६.०४.२०२६ पासून उपलब्ध असेल.
५. इच्छुक बोलीदार ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवजामध्ये विहीत केल्यानुसार समाविष्ट असलेल्या संबंधित अटी आणि शर्तींचे अनिवार्य वाचन आणि मंजूर केल्यानंतर सहभागी होऊ शकतात आणि त्यानुसार ई-लिलाव प्रक्रिया दस्तऐवजामध्ये विहीत केलेल्या पद्धतीने त्यांची स्वारस्य अभिव्यक्ती दि. ३१.०३.२०२६ पर्यंत सादर करावी.
६. परिसमापकास कोणतेही कारण न दर्शविता कोणताही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारण्याचे किंवा फेटाळण्याचे किंवा ई-लिलाव स्थगित करण्याचे/पुढे ढकलण्याचे/रद्द करण्याचे/सुधारित करण्याचे/समाप्त करण्याचे किंवा लिलाव प्रक्रियेमधून कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही मालमत्ता मागे घेण्याचे संपूर्ण अधिकार आहेत.
७. संकेताच्या कलम ३५च्या खंड (१) च्या उप-खंड (एफ)च्या शर्तीनुसार, इच्छुक बोलीदार संकेताच्या कलम २९ए (वेळोवेळी केलेल्या सुधारणांनुसार) मध्ये नमूद केलेले पात्रता निकष पूर्ण करण्यास अयशस्वी ठरल्यास, तो बोली सादर करण्यास पात्र नसेल.
८. आयबीबीआय (परिसमापन प्रक्रिया) विनियमन, २०१६, शेड्यूल। खंड १(१२)च्या विनियमन ३१ए(१) (एच) नुसार, लिलाव बंद झाल्यावर, उच्चतम बोलीदारास मागणीच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत शिल्लक विक्री मोबदला देण्याकरिता आमंत्रित करण्यात येईल. परंतु तीस दिवसांपेक्षा जास्त काळ केलेल्या कोणत्याही पेमेंटवर दरसाल १२% व्याजदराने नव्वद दिवसांपर्यंत व्याज आकारले जाईल. परंतु नव्वद दिवसांपेक्षा जास्त कालावधी वाढवणे हे एससीसी/परिसमापकाच्या स्वत:च्या विवेकबुद्धीनुसार असेल आणि नव्वद दिवसांपेक्षा जास्त कालावधीचा असा पेमेंट एससीसी किंवा परिसमापकाने ठरवलेल्या आणि विचारात घेतलेल्या व्याजदराच्या अधीन असेल. तथापि, परिसमापक/एससीसीवर नव्वद दिवसांपेक्षा जास्त कालावधी वाढवण्याचे कोणतेही बंधन असणार नाही.
९. संभाव्य बोलीदाराने संकेताच्या कलम २९ए अन्वये लागू मर्यादेपर्यंत कोणत्याही अपात्रतेचा सामना करीत नसल्याची हमी सादर करावी आणि जर ते कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळल्यास, जमा केलेली इसारा रक्कम जप्त करण्यात येईल.
१०. कोणत्याही चौकशीकरिता, कृपया पत्रव्यवहाराचा पत्ता - सूट क्र. ८०५, ८वा मजला, एम्बसी सेंटर, जमनालाल बजाज मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-४०००२१ किंवा प्रकल्प विशिष्ट ईमेल आयडी: cirpwindals@gmail.com येथे संपर्क करावा.

दिनांक: ०६.०३.२०२६
ठिकाण: मुंबई

सही/-
सीए राजन गर्ग
IBBI/IPA-001/IP-P-02397/2021-22/13624
विंडल्स ऑटो प्रायव्हेट लिमिटेडचे परिसमापक
नोंद. पत्ता: सदनिका क्र. २०२, विंग बी, २रा मजला, सफल ट्विन्स, ब्लॉक पंजाबवाडी, सायन-तुर्भे मार्ग, देवनार, मुंबई - ४०००८८. महाराष्ट्र
नोंद. ईमेल आयडी: fcarajangarg@gmail.com



# भूमीची प्रांजळ कबुली

**'वी द वूमेन'** या कार्यक्रमात संवाद साधताना अभिनेत्री भूमी पेडणेकरने कारकिर्दीतील चुकीच्या भूमिकांची निवड केल्याची प्रांजळ कबुली दिली आहे. अनेकदा २०० कोटी रुपयांच्या क्लबमध्ये सामील होणाऱ्या हिट चित्रपटाच्या मोहापायी किंवा महत्त्वाकांक्षेमुळे असे निर्णय घेतले गेल्याचे तिने सांगितले. अशा वेळी आपण एक अभिनेत्री म्हणून स्वतःची जी ओळख आणि ताकद निर्माण केली होती, ती कुठेतरी कमी पडली किंवा ती पुसट झाली, असेही ती म्हणाली.

भूमीने तिच्या व्यावसायिक मर्यादांबद्दलही स्पष्ट भूमिका मांडली आहे. ती म्हणाली की, कितीही दबाव असला तरी स्त्रीत्वाचा अनादर करणाऱ्या किंवा लिंगभेदाला खतपाणी घालणाऱ्या कोणत्याही भूमिकेशी ती कधीही तडजोड करणार नाही. कोणत्याही विशिष्ट चित्रपटाचे नाव न घेता तिने स्पष्ट केले की, मी आपल्या कामाच्या बाबतीत विनाकारण होणाऱ्या वादांपासून लांब राहणे पसंत करते.

आपल्या मूल्यांशी जुळणाऱ्या भूमिकांची संख्या कमी असली तरी चालेल, परंतु भविष्यात प्रतिमेला धक्का लागेल अशा चुका पुन्हा न करण्यावर माझा भर असेल, असेही तिने सांगितले. थोडक्यात, स्वतःची अस्मिता जपूनच अभिनय क्षेत्रात पुढे जाण्याचा तिचा ठाम निर्धार या संवादातून दिसून आला आहे.

# 'धुरंधर गर्ल' भीतीच्या सावटाखाली....

**'धुरंधर'** चित्रपटातील 'शरारत' या गाण्यामुळे घराघरांत पोहोचलेल्या आयशाने एका कार्यक्रमात आपले दुःख व्यक्त केले आहे. आयशाने सांगितले की, जेव्हा ती १२ वीत होती, तेव्हा तिला टी-सीरीजच्या एका गाण्यासाठी 'सेकंड लीड' म्हणून निवडण्यात आले होते. मात्र, तिचे वजन जास्त असल्याच्या कारणावरून चित्रीकरणाच्या अवघ्या एक रात्री आधी तिला त्या प्रकल्पातून काढून टाकण्यात आले. या घटनेमुळे तिला स्वतःच्या शरीराबद्दल आणि रूपाबद्दल आत्मविश्वास मिळवण्यासाठी बराच काळ संघर्ष करावा लागला. आयशाने इन्स्टाग्रामसारख्या प्लॅटफॉर्मवर होणाऱ्या तिच्या छळाबद्दलही भाष्य केले आहे. तिने कोणतेही कपडे घातले तरी लोक तिला 'सेक्शुअलाइज' (लैंगिक दृष्टिकोनातून पाहणे) करतात, अशी खंत तिने व्यक्त केली. एखादा साधा टॉप किंवा स्कर्ट घातला तरी लोकांच्या त्यावर आक्षेपार्ह कमेंटस् येतात. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे आयशाला दररोज बलात्काराच्या धमक्या मिळत असल्याचे तिने उघड केले आहे. अशा प्रवृत्तींविरुद्ध कठोर कारवाई व्हायला हवी, अशी अपेक्षा तिने यावेळी व्यक्त केली.





# सलमान साकारणार अनोखा सुपरहिरो

**राज आणि डीके** या प्रसिद्ध दिग्दर्शक जोडीसोबत सलमान खान गेल्या तीन महिन्यांपासून चर्चेत आहे. मिळालेल्या विशेष माहितीनुसार, हे दिग्दर्शक सलमानसाठी एक उपरोधिक आणि विनोदी अंगाने जाणारा सुपरहिरो चित्रपट विकसित करत आहेत. हा चित्रपट हॉलिवूडमधील 'हॅनकॉक' या गाजलेल्या चित्रपटाच्या धर्तीवर असण्याची शक्यता आहे. या चित्रपटात सलमान खान एका अशा सुपरहिरोची भूमिका साकारणार आहे, ज्याला आता जगाचे रक्षण करून कंटाळा आला असून त्याला आपले सुपरहिरोचे कवच बाजूला ठेवून निवृत्त व्हायचे आहे. मात्र, परिस्थिती त्याला शांत बसू देत नाही. अखेरीस एक मोठा संघर्ष उभा राहतो. सलमानला या चित्रपटाची मूळ संकल्पना अत्यंत आवडली असून, तो पटकथेच्या प्रतीक्षेत आहे. हा चित्रपट मर्यादित खर्चात तयार व्हावा अशी त्याची इच्छा आहे. जर सर्व काही नियोजित वेळेनुसार पार पडले, तर या चित्रपटाचे चित्रीकरण नोव्हेंबर २०२६ मध्ये सुरू होण्याची दाट शक्यता आहे.



# 'भागम भाग-२'चे भवितव्य टांगणीला

**अक्षय कुमार,** मनोज बाजपेयी आणि परेश रावल या दिग्गज कलाकारांच्या मुख्य भूमिका असलेल्या 'भागम भाग २' या चित्रपटाचे चित्रीकरणास या महिन्याच्या सुरुवातीपासून लखनौमध्ये प्रारंभ होणार होता; मात्र, निर्माती एकता कपूर आणि दिग्दर्शक राज शांडिल्य यांच्यातील कायदेशीर वादामुळे हा संपूर्ण कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे. राज शांडिल्य यांनी एकता कपूर यांच्या बॅनरखाली तीन चित्रपट करण्याचा करार केला होता. मात्र, कोणताही ना हरकत दाखला न घेता त्यांनी इतर बॅनरसाठी दोन चित्रपट करण्यास सुरुवात केली. तिसऱ्या चित्रपटासाठी घेतलेली आगाऊ रक्कम राज यांनी परत केली नसल्याचा आरोप एकता कपूर यांनी केला असून त्यांनी राज शांडिल्य यांच्यासह निर्माते अश्विन वर्दे आणि केप ऑफ गुड फिल्म्स यांना कायदेशीर नोटीस पाठवून चित्रीकरण थांबवण्याची मागणी केली आहे. या कायदेशीर गुंतागुंतीमुळे निर्मात्यांनी मार्च महिन्यातील २५ दिवसांचे नियोजित वेळापत्रक पूर्णपणे रद्द केले आहे. अक्षय, मनोज बाजपेयी आणि परेश रावल या तिघांच्याही तारखा सध्या मुक्त करण्यात आल्या आहेत. चित्रीकरण स्थगित झाल्यामुळे हा चित्रपट सध्या बासनात गुंडाळला गेल्याचे चित्र दिसत असून, नवीन दिग्दर्शकाच्या शोधात प्रकल्प पुन्हा सुरू होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.



# प्रीती मुकुंदनचे बॉलिवूडमध्ये पदार्पण

**दाक्षिणात्य** चित्रपटसृष्टीत आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणारी प्रतिभावान अभिनेत्री प्रीती मुकुंदन आता 'नागझिला' चित्रपटाद्वारे बॉलिवूडमध्ये पदार्पण करण्यास सज्ज झाली आहे. २०१४ मध्ये 'ओम भीम बुश' या तेलगू हॉरर कॉमेडीतून तिने करिअरची सुरुवात केली होती.

'नागझिला'मध्ये प्रीती एका अत्यंत मजेशीर भूमिकेत दिसणार असून, तिचे पात्र कथेला एक वेगळी कलाटणी देणारे ठरेल. निर्मात्यांच्या मते, या भूमिकेसाठी प्रीती ही योग्य निवड आहे आणि ती प्रेक्षकांना तिच्या अभिनयाची एक नवीन बाजू दाखवण्यास उत्सुक आहे. या चित्रपटाचे केवळ ७ दिवसांचे चित्रीकरण शिल्लक आहे.



# कृत्तिका-गौरव रमले घराच्या मेकओव्हरमध्ये

**कृतिका कामरा** आणि गौरव कपूर पुढील आठवड्यात विवाहबंधनात अडकणार आहेत. लग्नानंतर हे दाम्पत्य वांद्रे येथील त्यांच्या निवासस्थानी स्थायिक होणार असून, त्यापूर्वी या घराचे संपूर्ण रूप पालटले जात आहे. मार्चच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत हे काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या सजावटीमध्ये कृतिका कामरा स्वतः लक्ष घालत आहे.

घराची रचना आणि अंतर्गत सजावट आपल्या आवडीनुसार व्हावी, यासाठी ती डिझाईन टीमसोबत सतत संपर्कात आहे. या घराची सजावट प्रामुख्याने पारंपारिक स्पर्श आणि आधुनिक 'मिड-सेन्चुरी' पद्धतीचा मिलाफ असणार आहे. काळाच्या ओघात टिकून राहणारी रचना आणि समकालीन सुखसोयी यांचा समतोल राखण्यावर त्यांचा भर आहे. लग्नानंतर कुटुंब आणि मित्रपरिवाराचे स्वागत करण्यासाठी आकर्षक वातावरण निर्माण करणे, हा या नूतनीकरणामागचा मुख्य उद्देश आहे.

# केज-कळंब रोडवर बसची ट्रकला धडक! १३ जण जखमी

■ बीड

**केज-कळंब** रोडवरील चिंचोली पाटीजवळ आज सकाळी सुमारे ६ वाजताच्या सुमारास भीषण अपघात झाला. कोल्हापूरहून माजलगावकडे जाणाऱ्या एसटी बसने रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या ट्रकला पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात चालक, वाहक आणि प्रवासी मिळून १३ जण जखमी झाले.

या अपघातात बसच्या पुढील भागाचे मोठे नुकसान झाले. अपघाताची माहिती मिळताच पोलीस व बचाव पथक घटनास्थळी पोहचले व जखमींना बसमधून बाहेर काढले. या अपघातात चालक आनंद गायके (४०), वाहक विष्णू तांबडे (४२) यांच्यासह संजय खरात, चैतन खरात, भास्कर गायकवाड, आशा खरात, सचिन खरात, रोशनी खरात, भाग्यश्री गायकवाड, पायल गायकवाड, सुनिता खरात, सचिन सुरवसे आणि वैशाली राऊत हे जखमी झाले.

# विलीनीकरण ही दंतकथा! खा. संजय राऊत यांचा टोला

■ मुंबई

**राज्यसभेच्या** एका जागेसाठी महाविकास आघाडीमधून (मविआ) शरद पवार यांच्या नावावर सहमती झाल्यानंतर आज उबाठाचे प्रवक्ते खासदार संजय राऊत यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचे विलीनीकरण होण्याबाबतच्या चर्चेवर भाष्य केले. विलीनीकरण ही एक दंतकथा होती, असा टोला राऊत यांनी लगावला.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन गटांचे विलीनीकरण होणे शक्य नाही, हे मी पहिल्यापासून सांगत आलो आहे. अजित पवार हयात असताना मी हे वारंवार सांगत होतो. विलीनीकरण ही एक दंतकथा होती. आता ती दंतकथा संपली आहे, असे राऊत म्हणाले.



उबाठाने प्रियंका चतुर्वेदी यांना पुन्हा राज्यसभेवर का पाठवले नाही, असे विचारले असता, चतुर्वेदींना राज्यसभेवर पुन्हा पाठवण्याचा निर्णय पक्षात झाला होता. मात्र ऐनवेळी गणित जुळत नाही, असे दिसल्यामुळे निर्णय बदलावा लागला, असे त्यांनी सांगितले.

शरद पवार गटातील काही नेते विलीनीकरण करून सत्तेत सहभागी होण्यास उत्सुक आहेत. त्यांना नाव घेता राऊत यांनी संदेश दिला. जनतेने आपल्याला विरोधी पक्षात बसण्याचा कौल दिला. त्यामुळे आपण जबाबदार विरोधीपक्ष म्हणून कामगिरी पार पाडली पाहिजे. जनतेच्या समस्यांना वाचा फोडली पाहिजे. सत्ता आज आहे उद्या नाही. आज जे विरोधी पक्षात आहेत त्यांनी सत्ताधारी पक्षात जाण्याची घाई करू नये. पुढच्या निवडणुकीची वाट पहावी, असा सल्ला राऊत यांनी दिला.

# वाढवण जमीन मोबदला वाटप काम प्रगतीपथावर

## मंत्री बावनकुळे यांची माहिती

■ मुंबई

**राज्य** आणि केंद्र शासनाच्या विविध प्रकल्पांसाठी पालघर जिल्ह्याच्या बोईसर परिसरातील जमिनी संपादित करण्यात आल्या आहेत.यापैकी सध्या वाढवण बंदर ग्रिनफिल्ड महामार्गासाठीचे निवाडे जाहीर करुन मोबदला वाटपाची कार्यवाही प्रगतीपथावर आहे, अशी माहिती राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिली.

अर्थसंकल्पीय अधिवेशनात प्रश्नोत्तराच्या तासात सदस्य राजेंद्र गावित यांनी वाढवण बंदर ग्रिनफिल्डबाबत प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी झालेल्या चर्चेत सदस्य हरिश्चंद्र भोये यांनीही सहभाग घेतला. यावेळी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले,सूर्या प्रकल्प कालव्यांच्या बांधकामासाठी संपादित जमिनीचा मोबदला शेतकऱ्यांना अदा करण्यात आला आहे.त्यातील हनुमाननगर,नेकुळे गावातील प्रकल्पग्रस्तांच्या अधिकार अभिलेख्याचा आकारबंद घडवून अभिलेख अद्ययावत करण्याची कार्यवाही सुरू आहे.उर्वरित जमीन संपादनाबाबत भूसंपादन संस्थेकडील एसआयएमधून सूट मिळण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही नियोजित आहे.

# मुंबईतील फुटपाथवर आता दुचाकी वाहनांना प्रवेश बंदी

■ मुंबई

**मुंबईतील** फुटपाथ पादचाऱ्यांना चालण्यासाठी आहेत. परंतु रस्त्यावर वाहतूककोंडी झाल्यास दुचाकीस्वार फुटपाथवरून आपली वाहने घेऊन जातात. त्यामुळे आता ३८४ कोटी ९८ लाख २३ हजार रुपये खर्च करून मुंबईतील फुटपाथवर रेलिंग्ज व बोलाइंस बसवले जाणार आहेत. हे रेलिंग्ज व बोलाईस बसवताना व्हिलचेअर ये-जा करू शकेल, अशी जागा उपलब्ध करण्यात येणार आहे, अशी माहिती मुंबई महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अभिजीत बांगर यांनी दिली. पादचारी सुरक्षेला प्राधान्य देत वाहनांची अनधिकृत पार्किंग, फुटपाथवर होणारे अतिक्रमण आणि बेकायदेशीर प्रवेश रोखण्यासाठी ही उपाययोजना करण्यात येत आहे.जीएफआरसी साहित्य टिकाऊ, गंजरोधक आणि दीर्घकाळ टिकणारे असल्याने देखभाल खर्च तुलनेने कमी राहणार असल्याचे पालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. फुटपाथवर बेकायदा



फेरीवाल्यांनी कब्जा केला असून त्यावरून दुचाकी वाहने जातात कशी,महापालिका काही उपाययोजना करणार का,असा सवाल उच्च न्यायालयाने मुंबई महापालिकेला केला होता.त्यामुळे पालिकेच्या आदेशानंतर आता फुटपाथवर रेलिंग्ज व बोलाईस बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# वसई-विरारसाठी ३ पाणी योजना

## खोलसापाडा प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात

■ वसई

वसई विरार शहराच्या भविष्यातील पाण्याचे नियोजन करण्यासाठी देहरजी, सुसरी आणि खोलसापाडा अशा योजनांचे काम प्रस्तावित आहेत. खोलसापाडा धरण योजनेच्या टप्पा १ मधील वनजमिनीच्या दावे निकाली निघाले आहेत. या योजनेच्या बंधाऱ्याचे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे. सध्या या योजनेचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहे.

वसई विरार शहराची वाढती लोकसंख्या आणि पाण्याची मागणी लक्षात घेऊन देहरजी, सुसरी आणि खोलसापाडा या तीन पाणी योजनांचे प्रस्ताव आहे. या योजनांचा आढावा घेण्यासाठी माजी आमदार हितेंद्र ठाकूर यांच्यासमवेत पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्याची बैठक पार पडली. खोलसापाडा योजनेच्या बंधाऱ्याचे ९० टक्के काम पूर्ण झाले आहे.

# अंगणवाडी सेविकांना प्रोत्साहन भत्ता मंत्री आदिती तटकरे यांची माहिती



■ मुंबई

**मुख्यमंत्री-माझी** लाडकी बहीण योजना अंतर्गत अर्ज भरण्याचे काम करणाऱ्या अंगणवाडी सेविका व पर्यवेक्षिकांना प्रोत्साहन भत्ता देण्यासाठी निधी वितरित करण्यात आला असून तो कर्मचाऱ्यांना देण्यात आल्याची माहिती महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी विधानपरिषदेत दिली.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना अंतर्गत अर्ज भरण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेल्या अंगणवाडी सेविका व अंगणवाडी पर्यवेक्षिका यांनी भरलेल्या पात्र लाभार्थ्यांच्या नोंदीनुसार प्रोत्साहन भत्ता देण्यासाठी पुणे येथील महिला व बालविकास आयुक्तांना निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यानुसार संबंधित कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन भत्ता अदा करण्यात आला आहे. अंगणवाडी कर्मचाऱ्यांना ग्रॅज्युईटी व पेन्शन लागू करण्याबाबत शासन स्तरावर प्रस्तावावर सध्या विचारविनिमय सुरू आहे. तसेच अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना मानधनाव्यतिरिक्त कामाच्या आधारावर प्रतिमाह अनुक्रमे २ हजार व १ हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन भत्ता दिला जात आहे.

# येळीव तलाव आटू लागला! पाणी सोडण्याची मागणी

■ सातारा

**खटाव** तालुक्यातील येळीव तलावातील पाणी पातळी कमी होत चालली आहे.हा तलाव आटण्याच्या मार्गावर आहे.सध्या तलावातील उपलब्ध असणारा पाणीसाठा अल्प प्रमाणात असल्याने येत्या काही दिवसात तो संपून पीक पाण्याचे नियोजन कोलमडणार असल्याने शेतकरी चिंतातूर झाले आहेत. त्यामुळे लवकरात लवकर तलावात पाणी सोडण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

उन्हाची तीव्रता अधिक असल्याने पाण्याचे बाष्पीभवन होऊन तलावातील पाणीसाठा वेगाने कमी होत आहे. त्यामुळे तलावातील पाण्यावर अवलंबून असणाऱ्या औंध, येळीव, उंचीठाणे, पळशी, लाडेगाव, करांडेवाडी, वांझोळी आदी गावांना मोठ्या प्रमाणावर पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

# हवा गुणवत्ता मोजणाऱ्या यंत्रात फेरफार! वरुण सरदेसाईंचा आरोप



■ मुंबई

**शहरातील** वाढत्या प्रदूषणाच्या मुद्यावरून विधानसभेत जोरदार खडाजंगी झाली. उबाठा आमदार वरुण सरदेसाई यांनी हवेची गुणवत्ता मोजणाऱ्या एक्यूआय सेन्सरच्या आकडेवारीत फेरफार (डेटा मॅनिप्युलेशन) केला जात असल्याचा आरोप सरकारवर केला.

सरकारकडून शहरातील विविध ठिकाणी एक्यूआय सेन्सर बसविण्यात आल्याचे सांगण्यात आले आहेत. मात्र सरदेसाई यांनी दावा केला की, ज्या ठिकाणी हे सेन्सर लावले आहेत, त्या ठिकाणीच पाण्याचे फवारे मारले जातात. त्यामुळे त्या भागातील हवा स्वच्छ असल्याचे चित्र निर्माण होते. हा केवळ आकड्यांचा खेळ असून लोकांची दिशाभूल केली जात आहे. या पूर्ण प्रक्रियेचे निष्पक्ष थर्ड पार्टी ऑडिट झाले पाहिजे. खरेच प्रदूषणासंबंधीचे नियम पाळले जात आहेत का, याची पडताळणी होणे आवश्यक आहे. तसेच शहरातील अनेक झोपडपट्टींमध्ये अनधिकृत लघुउद्योग सुरू असून त्यामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. याकडे महापालिका जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत आहे. काही प्रकल्पांमध्ये लोकप्रतिनिधींनाही प्रवेश दिला जात नाही.


# एसटी बसच्या सर्व चालकांसाठी आता 'अल्कोटेस्ट' बंधनकारक

■ मुंबई

**एसटी** बसच्या सर्व चालकांसाठी दररोज 'अल्कोटेस्ट' महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने बंधनकारक केली आहे. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांच्या निर्देशानुसार, आगारात कामावर हजर होणाऱ्या प्रत्येक चालकाची मशीनद्वारे तपासणी करून व त्याची रीतसर नोंद घेऊनच त्यांना कर्तव्यावर पाठवण्यात येणार आहे. त्यामुळे एसटीचा प्रवास अधिक सुरक्षित होण्यास मदत होईल.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी २५ जानेवारी रोजी मुंबईतील परळ बसस्थानकाची अचानक पाहणी केली असता, चालक-वाहकांच्या विश्रांतीगृहामध्ये मद्याच्या बाटल्या आढळून आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या भेटीदरम्यान काही कर्मचारी मद्यधुंद अवस्थेत असल्याचेही निदर्शनास आले. ज्यामुळे एसटी प्रशासनातील शिस्तीचा आणि प्रवाशांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. या प्रकरणाची गंभीर दखल घेत मंत्री सरनाईक यांनी तातडीने चौकशी समिती नेमण्याचे आदेश दिले.

# नवाकाळ शब्दकोडे १५३८



**आडवे शब्द -**

२. लाल रंगाचा व त्यावर काळे-राखाडी पट्टे असलेला घोडा ५. अस्वस्थ, व्याकूळ ९. ताठा, अहंकार ११. चकमकीचा दगड १२. चातुर्य १४. देवाने याला सोन्याची व चांदीची कुऱ्हाड बक्षीस दिली होती १५. मोठा १६. गावातील पेठ १८. भूषण २१. निखाऱ्यावर भाजलेली रोटी २२. आसरा, आश्रय २४. दृष्टी २६. इजिप्तची जगप्रसिद्ध नदी २८. थैली २९. रड्या, निराशावादी ३२. संकटातून तारणारा ३४. पिकलेले गरे टणक असलेला फणस ३५. क्षमा ३६. नयन, लोचन ३७. लाकूड ३८. थोडी ३९. पडवी ४१. कुंपण ४२. अवकृपा, राग ४४. वेडपट ४५. गाणे रचणारा ४७. गुणवत्ता डावलून नातलगांना संधी देणे ४९. रोगप्रतिबंधक इंजेक्शन ५१. विश्रांती ५२. ओझे ५३. सत्पुरुषाने देहत्याग केलेले स्थान ५४. वाळवंट ५५. एकाग्र नजर ५७. आर्थिक टंचाई ६१. भीमाचे शस्त्र ६२. यकृताचा मोठा आजार ६३. कोकण व गोव्यातील एक दैवत ६४. चंचल मन ६७. सरपटणारे प्राणी ६८. प्रयत्न, प्रयास ६९. मैत्री ७२. तपासणी करणारा ७४. नव्या पालवीचा ऋतू ७५. चालचलन ७६. पाणी ७७. व्यापारी ७८. दाणेदार ८०. खांबावर आडवी टाकलेली तुळई ८२. सूक्ष्म तुकडा ८३. व्यक्ती ८४. शेष, शिल्लक ८५. बोलणे ८६. मिठागर ८७. मौज, धमाल ८८. पाण्यात राहणारा प्राणी ९०. वालुकामय प्रदेश ९२. पोहणे ९४. नाशिकची गंगा ९६. दिलगिरी ९८. प्रभात ९९. ताकद १००. पिठूळ पदार्थ १०१. सलाम

**उभे शब्द -**

१. सोम्यागोम्या, क्षुद्र इसम २. इंद्रियांना न जाणवणारे ३. दासी ४. ढिगारा ५. लग्न न झालेला ६. मैत्रीण, सखी ७. वाकून केलेला नमस्कार ८. विपुल संपत्ती ८. वेळ दाखवणारे यंत्र १०. उतरती कळा १३. हीन १६. अनागोंदी, आपसातील हाणामारी १९. संकोची स्वभावाचा २१. दालन २३. अनियंत्रित जमाव २४. झुकलेला २५. उपवासाला चालणारा गोड कंद २६. बेअब्रू होणे २७. शरम, लाज २८. सतत झोपणारा २९. गेल्या शतकातला गाजलेला गायक मोहंमद xx ३०. तमाशा कलावंत ३१. छाती ३३. अक्कलशून्य ३४. काबाड कष्ट, राबणे ३५. वाटचाल ३६. डोके, मस्तक ४०. पद्धत, तऱ्हा ४१. नवरदेवाची आई ४२. कोरडी भिक्षा ४३. भगिनी ४४. सजीव आणि निर्जीव सृष्टी ४६. कासोटा, खोकला ४८. विद्येची देवी ५०. दुष्ट स्त्री ५२. चुलीमागचा ओटा ५६. शिखर, वरचा भाग ५८. खंदक ५९. शंकराचे धनुष्य ६०. टोमॅटोचे टिकाऊ तोंडीलावणे ६१. मासेमारीचा हूक ६२. चुलता ६४. अडथळा ६५. दुधीपेक्षा लांब आकाराची फळभाजी ६६. सुख ६८. मालक, स्वामी ६९. पंजाबची मोठी नदी, शतद्रू ७०. मृग ७१. वेळू, कीचक ७२. गहू, जव, तांदूळ यांचे सत्त्व ७३. सुकुमार, नाजूक, कोमल ७५. ताक घालून केली जाणारी एक पालेभाजी ७६. सरकारी अधिकारी ७९. तुफान ८१. मोजदाद ८३. दुखापत ८४. भाकरीचे एक धान्य ८६. पलंग ८७. पाठीचा कणा ८९. रुचकर, स्वादिष्ट ९०. सुंदर स्त्री ९१. प्रणाम ९३. आवड, स्वारस्य ९५. तमाशा, लोकनाट्य ९६. उतरती कळा ९७. हाक, बोलावणे •

**नवाकाळ कोडे क्रमांक १५३७ चे उत्तर**

**आडवे शब्द :** १. आवृत ३. नाइलाज ६. राजबिंडा ९. निजधाम १३. गद्धा १५. टाकाऊ १७. गराडा १९. पावन २०. टीप २१. लाचखाऊ २४. पूतना २६. डूल २७. कशीफळ २९. सरस ३१. रगेल ३३. वर ३४. चळत ३५. वरी ३६. कहर ३८. केरसुणी ३९. लघळ ४१. जोकर ४३. रजनीकर ४६. खीर ४७. खडा ४८. मतलब ४९. अतीव ५१. दिवंगत ५३. धुमारा ५५. मरकत ५६. क्रतु ५८. चीज ५९. धड ६०. सहारा ६२. एकर ६४. मटकी ६५. वन्ही ६६. गूढ ६८. जन ६९. वळू ७०. मेद ७१. इसब ७२. हकीम ७५. नफा ७७. आडाखा ७९. नखरा ८१. शिवार ८२. भौमवासर ८३. पर्ण ८४. वादातीत ८८. भगर ८९. वाटा ९०. रजक ९२. पडीक ९३. आरूढ ९४. फोडणी ९६. वीट ९७. वामन ९८. तगड १००. पखवाज १०२. मुशाफिरी १०५. बाणेदार १०८. लाट ११०. खाडी १११. बिरबल ११३. सोळा ११४. वजा ११५. भपकेबाज ११६. सर्रास ११७. लाभ

**उभे शब्द :** १. आगटी २. वृद्धापकाळ ४. इलाखा ५. जटा ६. राऊत ७. बिंग ८. डाराडूर १०. जपान ११. धाव १२. मनधरणी १४. मिलाफ १६. कापूस १८. डालगे२२. चळवळ २३. ऊस २५. नामोहरम २८. शीतल ३०. रसिक ३२. लकेर ३३. वसुमती ३४. चलाखी ३७. रजत ४०. घडवंची ४१. जोडा ४२. रक्तिमा ४४. नीलम ४५. कबरस्तान ४७. खत ४९. अतएव ५०. वखार ५२. गजवदन ५३. धुडगूस ५४. रास ५६. क्रम ५७. तुटवडा ६१. हालहवाल ६३. कळूनसवरून ६७. ढब ६८. जम ७१. इरादा ७३. कीर ७४. चमकी ७६. फार ७७. आवभगत ७८. खापर फोडणे ८०. खवाटा ८५. तीर८६. तजवीज ८७. हिडीसफिडीस ८९. वाणी ९१. कट ९३. आमचूर ९५. लखलाभ ९९. गबाळा १०१. वाटप १०३. शाखा १०४. सुलभ १०६. दाव १०७. रजा १०९. सांबा १११. बिस ११२. बला

# एकनाथ शिंदेंनी ज्येष्ठ नेत्यांना डावलले
## सतत पक्ष बदलणाऱ्या वाघमारे राज्यसभेवर

पान १ वरून

वडकुटे आणि नागपूरच्या भाजपा नेत्या माया इवनाते यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया पार पडली. अजित पवार गटाकडून पार्थ पवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. शिंदे गटाकडून शेवटच्या क्षणी ज्योती वाघमारे यांना उमेदवारी देण्यात आली. तर महाविकास आघाडीच्या वतीने ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी उमेदवारी अर्ज भरला.

राज्यसभा निवडणुकीसाठी शरद पवार यांनी दोन अर्ज दाखल केले आहेत. पार्थ पवार आणि ज्योती वाघमारे यांनीही दोन अर्ज दाखल केले आहेत. एखादा अर्ज तांत्रिक कारणामुळे बाद झाल्यास दुसरा अर्ज वैध राहावा, यासाठी ही खबरदारी घेण्यात आली आहे. तब्येतीच्या कारणामुळे शरद पवार स्वतः उपस्थित राहून अर्ज दाखल करू शकले नाहीत. त्यामुळे निवडणूक अधिकाऱ्यांनी त्यांच्या 'सिल्वर ओक' या निवासस्थानी जाऊन शपथ प्रक्रिया पूर्ण केली. आरोग्य कारणामुळे उमेदवार उपस्थित राहू शकत नसल्यास शपथपत्राद्वारे उमेदवारी अर्ज दाखल करण्याची तरतूद आहे. महाराष्ट्रात अशा प्रकारे अर्ज दाखल होण्याची ही पहिलीच घटना मानली जात आहे. या अर्जासाठी स्वर्गीय आर. आर. पाटील यांचे पुत्र आणि आमदार रोहित पाटील यांचे नाव सूचक म्हणून देण्यात आले होते. अर्ज भरताना संजय राऊत, भास्कर जाधव, सुप्रिया सुळे, शशिकांत शिंदे, रोहित पवार, सतेज पाटील, नाना पटोले आणि हर्षवर्धन सपकाळ उपस्थित होते. दरम्यान, उद्धव ठाकरे गटाकडून प्रियांका चतुर्वेदी यांना उमेदवारी देण्याबाबत आमदार आदित्य ठाकरे यांचा आग्रह होता. मात्र एकमताने शरद पवार यांच्या नावावर निर्णय झाल्याने प्रियांका चतुर्वेदी यांना संधी मिळाली नाही.

राज्यसभेच्या सात जागांसाठी भाजपाचे चार, अजित पवार गटाचा एक, शिंदे गटाचा एक आणि महाविकास आघाडीचा एक असे सात उमेदवार असल्याने ही निवडणूक बिनविरोध होत आहे. शिंदे गटाकडून दोन उमेदवार देण्याची चर्चा होती. पक्षाकडे अतिरिक्त २० मते असल्याने दुसरा उमेदवार देऊन निवडणूक रंगतदार होऊ शकते, असे चित्र होते. राहुल शेवाळे यांच्या नावाचीही चर्चा होती. मात्र अखेरच्या क्षणी पक्ष बदलून शिंदे गटात आलेल्या ज्योती वाघमारे यांना संधी देण्यात आल्याने पक्षात नाराजीची चर्चा सुरू झाली आहे.

शिंदे गटाचे वरिष्ठ नेते आणि माजी खासदार आनंदराव अडसूळ यांनी उघडपणे नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, मी चार वेळा खासदार राहिलो आहे. मला संसदरत्न पुरस्कार मिळाला आहे. त्यामुळे राज्यसभेसाठी माझ्या नावाचा विचार व्हावा, अशी अपेक्षा होती. मात्र ऐनवेळी ज्योती वाघमारे यांचे नाव पुढे आले. हे नाव कसे पुढे आले याची मला माहिती नाही. मला संधी द्यायची नव्हती तर किमान माझ्या मुलाचा तरी विचार करायला हवा होता. तो पक्षाचा राष्ट्रीय सचिव असून, पक्षासाठी मेहनत घेत आहे.

### ज्योती वाघमारे कोण आहेत?

शिंदे गटाकडून राज्यसभेसाठी निवडून आलेल्या प्रा. डॉ. ज्योती वाघमारे यांची सोलापूरमधील धडाकेबाज महिला कार्यकर्त्या, अभ्यासू वक्त्या आणि आंबेडकरी चळवळीतील सक्रिय चेहरा म्हणून त्यांची ओळख आहे.

सामाजिक कार्याची सुरुवात त्यांनी मानवी हक्क अभियान, विद्रोही सांस्कृतिक चळवळ आणि आंबेडकरी चळवळीतून केली. काही काळ त्यांनी वृत्तनिवेदिका म्हणूनही काम केले. २०१४ मध्ये त्या सोलापूर महिला काँग्रेसच्या शहराध्यक्ष होत्या, तर २०१७ मध्ये त्यांनी भाजपाकडून सोलापूर जिल्हा परिषद निवडणूक लढवली होती. २०२२ मध्ये शिवसेनेत फूट पडल्यानंतर त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या गटात प्रवेश केला. त्या काळात शिंदे गटात महिला नेतृत्वाची पोकळी होती. वाघमारे यांनी सक्रिय भूमिका घेतल्याने त्यांची शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या म्हणून नियुक्ती करण्यात आली होती.

ज्योती वाघमारे उमेदवारी मिळाल्यानंतर प्रतिक्रिया देताना म्हणाल्या की, ही केवळ माझी उमेदवारी नाही. महाराष्ट्रातील अडीच कोटी लाडक्या बहिणींची ही उमेदवारी आहे. लाडक्या भावाने आपल्या लाडक्या बहिणीला दिलेली ही ओवाळणी आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे मी मनापासून आभार मानते.

शिंदे गटाचे नेते व मंत्री संजय शिरसाट यांनीही या निर्णयाचे समर्थन केले. ते म्हणाले की, राज्यसभेच्या या जागेसाठी पक्षातील अनेक जण इच्छुक होते. मात्र सर्वसामान्य महिलेला संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला. ज्योती वाघमारे राज्यसभेत पक्षाचे चांगले प्रतिनिधित्व करतील, असा विश्वास आहे. नाराज कार्यकर्त्यांची नाराजीही दूर केली जाईल.

या निवडणुकीत अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार हे पहिल्यांदाच राज्यसभेवर जाणार आहेत. याबाबत बोलताना सुप्रिया सुळे यांनी सांगितले की, संसदेत गेल्यानंतर कमी बोलावे, जास्त ऐकावे आणि जेव्हा संधी मिळेल तेव्हा अभ्यासपूर्ण मते मांडावीत, असा सल्ला शरद पवार नेहमी देतात.

### 'नवाकाळ' वर्तमानपत्राच्या मालकी व इतर माहितीसंबंधीचा फॉर्म - ४ (पाहा नियम-८)

१. **वर्तमानपत्र प्रसिद्ध करण्याचे ठिकाण :** नवाकाळ बिल्डिंग, १३, नवाकाळ पथ, खाडिलकर रोड, गिरगाव, मुंबई-४००००४. महाराष्ट्र.
२. **त्याच्या प्रसिद्धीचा काळ:** दररोज प्रसिद्ध होतो
३. **मुद्रकाचे नाव :** जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे
**राष्ट्रीयत्व:** भारतीय हिंदू
**पत्ता:** नवाकाळ बिल्डिंग, १३, नवाकाळ पथ, खाडिलकर रोड, गिरगाव, मुंबई-४०० ००४. महाराष्ट्र.
४. **प्रकाशकाचे नाव** जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे
**राष्ट्रीयत्व:** भारतीय हिंदू
**पत्ता:** नवाकाळ बिल्डिंग, १३, नवाकाळ पथ, खाडिलकर रोड, गिरगाव, मुंबई-४०० ००४. महाराष्ट्र.
५. **संपादकाचे नाव** रोहित रमाकांत पांडे
**राष्ट्रीयत्व:** भारतीय हिंदू
**पत्ता:** नवाकाळ बिल्डिंग, १३, नवाकाळ पथ, खाडिलकर रोड, गिरगाव, मुंबई-४०० ००४. महाराष्ट्र.
६. जे कोणी वर्तमानपत्राचे **मालक आणि भागीदार** किंवा जे कोणी एकूण भांडवलाच्या १ टक्क्यापेक्षा जास्त भाग धारण करतात त्यांची नावे-
**१) जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे**
नवाकाळ बिल्डिंग, १३, नवाकाळ पथ, खाडिलकर रोड, गिरगाव, मुंबई-४०० ००४. महाराष्ट्र.
**२) रोहित रमाकांत पांडे**
नवाकाळ बिल्डिंग, १३, नवाकाळ पथ, खाडिलकर रोड, गिरगाव, मुंबई-४०० ००४. महाराष्ट्र.
७. **वर्तमानपत्राचे मालक :** नवाकाळ ऑफीस व नवाकाळ प्रेस
मी जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे याद्वारे जाहीर करते की, वर दिलेली माहिती माझ्या समजुतीप्रमाणे आणि मताने खरी आहे.

**जयश्री रमाकांत खाडिलकर-पांडे**
(प्रकाशकाची सही)
ता. ०६-०३-२०२६

# ई-चलनविरोधात वाहतूकदार आक्रमक

पान १ वरून

आंदोलकांनी पोलीस उपायुक्त प्रशांत कदम यांना आपल्या मागण्यांचे निवेदनही दिले. पुण्यातही रिक्षा संघटना आणि मालवाहतूकदार संयुक्त कृती समितीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार निदर्शने केली. ई-चलन प्रणालीद्वारे बेकायदेशीर वसुली होत असल्याचा आरोप करत दोन तास रिक्षा आणि मालवाहतूक बंद ठेवण्यात आली. मुंबईतील आझाद मैदानावरही ५०० ते १००० वाहतूक व्यावसायिकांनी शक्तिप्रदर्शन केले. ट्रक, टेम्पो, टॅक्सी, रिक्षा, खासगी ट्रॅव्हल्स तसेच स्कूल बस संघटनांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला. आंदोलकांच्या मते, एका चुकीसाठी दिवसातून अनेक वेळा ई-चलन आकारले जाते. तसेच पार्किंगची सुविधा नसतानाही दंड आकारला जातो.

या संपामुळे दूध, भाजीपाला आणि इंधन पुरवठ्यावरही पुढील ४८ ते ७२ तासांत परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक या संपाबाबत म्हणाले की, वाहतूकदारांच्या संपामुळे राज्यातील जनजीवन विस्कळीत होण्याची शक्यता आहे. त्यामुळे वाहतूकदार संघटनांनी संप मागे घ्यावा. काल मुख्यमंत्र्यांशी या विषयावर चर्चा झाली. यापूर्वी नेमलेल्या समितीचा अहवालही प्राप्त झाला आहे. त्या अहवालावर पोलीस विभाग आणि वाहतूक विभाग (आरटीओ) यांचा समन्वय साधून अधिकाऱ्यांसह मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत बैठक घेण्याची विनंती करण्यात आली होती. मुख्यमंत्र्यांनीही ही विनंती मान्य केली आहे. अधिवेशन संपल्यानंतर तातडीने संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन वाहतूकदार आणि शासन यांच्यात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला जाईल. या संदर्भातील पत्र वाहतूकदार संघटनांच्या प्रतिनिधींना दिले आहे.

# युध्दविरोधी ठराव फेटाळला! ट्रम्पना स्वपक्षीयांचा पाठिंबा

पान १ वरून

राष्ट्राध्यक्षांना स्वतःच युद्ध करण्याचा निर्णय असू नये, असे या ठरावात म्हटले होते. हा ठराव मंजूर झाला असता तर ट्रम्प यांना कोणत्याही देशावर हल्ला करण्यापूर्वी अमेरिकन काँग्रेसची मंजुरी घेणे बंधनकारक झाले असते. मात्र शंभर सदस्यांच्या अमेरिकन सिनेटमध्ये ठरावाच्या विरोधात ५३ तर ठरावाच्या बाजूने ४७ मते पडली. हा ठराव बहुमताने फेटाळण्यात आला. त्यामुळे ट्रम्प यांच्या मार्गातील मोठा अडथळा दूर झाला आहे. इराणचे आयातुल्ला अब्दुल्ला जावादी-अमोली यांनी थेट ट्रम्प आणि इस्त्रायलच्या यहुदींचा

खात्मा करण्याचा फतवा काढून आगीत तेल ओतण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी इराणच्या शरिया कायद्याचा आधार घेत अमेरिका आणि इस्त्रायलविरुद्धचे युध्द हे धर्मयुध्द असून, जो कट्टर शिया मुस्लीम या धर्मयुध्दात आपल्या प्राणांची आहुती देईल, त्याला ईश्वरप्राप्ती होईल, असे फतव्यामध्ये म्हटले आहे. जगभरातील शियापंथी मुस्लिमांनी एकजुटीने ट्रम्प आणि यहुदींचा खात्मा करावा, अशी हाक या फतव्याच्या माध्यमातून जावादी यांनी दिली आहे.

इस्त्रायल आणि अमेरिकेने युध्द छेडल्यापासून इराणने होर्मुज सामुद्रधुनीच्या रुपाने आपल्या भात्यातील अत्यंत परिणामकारक शस्त्र उपसले आहे. इराणच्या इस्लामिक रिव्हॉल्युशनरी गार्डने होर्मुजचा ताबा घेतला असून, या जलमार्गातून येणाऱ्या कोणत्याही देशाचे जहाज क्षेपणास्त्र किंवा ड्रोनच्या सहाय्याने उडवून देण्याची धमकी दिली आहे. त्यामुळे संपूर्ण जगाचा कच्च्या तेलाचा पुरवठा विस्कळीत झाला आहे. मात्र, आज इराणने चीनला होर्मुज जलमार्ग वापरण्याची परवानगी दिल्यामुळे चीनची इंधनाबद्दलची चिंता दूर झाली आहे. या युध्दात चीनने उघडपणे इराणची बाजू घेतली आहे. युध्दात अमेरिका आणि इस्त्रायलच्या हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून इराण अत्यंत अचूकपणे क्षेपणास्त्र आणि ड्रोनचे हल्ले करत असल्याने चीन आपल्या उपग्रहांच्या सहाय्याने इराणला हे अचूक हल्ले करण्यासाठी छुपी मदत करत असल्याची चर्चा आहे. होर्मुज सामुद्रधुनीचा मार्ग खुला होणे हे चीनसाठीही अत्यंत गरजेचे होते. म्हणूनच चीनने हे युध्द तत्काळ थांबवण्याचे आवाहन केले होते. कारण चीन हा इराणकडून तेल खरेदी करणारा सर्वात मोठा खरेदीदार देश आहे. होर्मुज जलमार्ग आणखी काही दिवस बंद राहिला असता तर चीनमध्ये मोठे इंधनसंकट ओढवले असते. दरम्यान, आखाती युद्धाच्या सहाव्या दिवशी आज इस्त्रायल-इराणचे परस्परांवर हल्ले सुरूच राहिले. इस्त्रायल-अमेरिकेकडून तेहरानवर रात्रभर हल्ले करण्यात आले. इस्त्रायल-अमेरिकेने केलेल्या हल्ल्यात आतापर्यंत १,४०५ इराणी नागरिकांचा मृत्यू झाला आहे. इराणनेही आज इस्त्रायलची राजधानी तेल अवीवच्या क्रिआ भागावर हल्ला केला. इराणने संयुक्त अरब अमिरातीचे दिमोना अणुकेंद्र उडवण्याची धमकी दिली. इराणने जमिनीखाली ५०० मीटर खोल अंतरावर आपली क्षेपणास्त्र लपवली आहेत. तिथून ही क्षेपणास्त्र इस्त्रायल आणि अमेरिकेच्या मित्रदेशांवर डागली जात आहेत.

काल श्रीलंकेच्या सागरी हद्दीत इराणची आयआरआयएस देना युद्धनौका अमेरिकेने बुडवल्यावर त्याच ठिकाणी इराणने आणखी एक युद्धनौका आणून उभी केली आहे. इराणने श्रीलंकेला विनंती केली आहे की, या युद्धनौकेला सुरक्षिततेसाठी त्यांच्या सागरी हद्दीत प्रवेश देण्यात यावा. श्रीलंकेने अद्याप अधिकृत प्रतिसाद दिलेला नसला तरी राष्ट्रपती अनुर कुमार दिसानायके यांनी इराणच्या विनंतीवर चर्चा करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेतली आहे. आतापर्यंत श्रीलंकेने या संघर्षात तटस्थ भूमिका घेतली असून, संयम आणि तातडीने तणाव कमी करण्याचे आवाहन केले आहे. आयआरआयएस देना ही नौका बुधवारी अमेरिकेने पाणसुरुंग हल्ला करून बुडवली. त्याचप्रमाणे या दुसऱ्या नौकेलाही लक्ष्य केले जाऊ शकते, अशी या नौकेवरील सुमारे १०० हून अधिक नौसैनिकांना भीती आहे.

# दावोस दौऱ्यात बोगस करार
## नाना पटोलेंचा सरकारवर आरोप

मुंबई

**दावोस** दौऱ्यात राज्य सरकारने हजारो कोटींचे बोगस करार केल्याचा गंभीर आरोप काँग्रेस आमदार नाना पटोले यांनी केला आहे. मोठे उद्योग महाराष्ट्रात येतील, या अपेक्षेने जनता दावोस दौऱ्याकडे पाहत होती. मात्र मुख्यमंत्र्यांनी मंत्रालयाजवळील आणि कांदिवलीतील छोट्या गाळ्यात चालणाऱ्या कंपन्यांशी हजारो कोटींचे करार केल्याचा दावा त्यांनी केला. पटोले म्हणाले की, ज्या कंपनीचे वर्किंग कॅपिटल केवळ ४ ते ५ लाख रुपये आहे आणि जी कांदिवलीतील छोट्या इमारतीत कार्यरत आहे, अशा कंपनीसोबत तब्बल ४ हजार कोटींचा करार करण्यात आला. या कंपनीकडून ६ हजार रोजगार निर्माण होणार असल्याचा सरकारचा दावा आहे. मात्र करार करण्यापूर्वी संबंधित कंपनीची आर्थिक क्षमता तपासली जात नाही का? मंत्रालयाच्या आसपास असणाऱ्या लोकांशी किंवा छोट्या कंपन्यांशी करार करण्यासाठी दावोसपर्यंत जाण्याची गरज नव्हती. हे करार मंत्रालयात बसूनही करता आले असते.

# विधेयकाला मंत्रिमंडळाची मंजुरी

पान १ वरून

प्रकरणांमध्ये आरोपींना अटक करणे शक्य होईल. त्याला सहजासहजी जामीन मिळणार नाही. या विधेयकाच्या सर्व तांत्रिक आणि कायदेशीर पैलूंची सविस्तर माहिती लवकरच सार्वजनिक केली जाईल. जेणेकरून सर्वसामान्य नागरिकांना नियमांची ठळकपणे माहिती मिळेल. मध्य प्रदेश आणि गुजरातसारख्या राज्यांमध्ये असलेल्या कायद्यापेक्षा महाराष्ट्रातील कायद्यात अधिक कठोर तरतुदी समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्यामुळे कायदा इतर राज्यांपेक्षा अधिक कडक आणि प्रभावी असेल.

# औद्योगिक अपघातग्रस्तांना समान भरपाई द्या! मुनगंटीवार संतापले

पान १ वरून

अपघातांच्या किती प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल झाले? प्रत्यक्षात किती दोषींवर कठोर कारवाई झाली? याचा तपशील सरकारने जाहीर करावा. केवळ गुन्हे दाखल करून काहीही साध्य होत नाही. या पार्श्वभूमीवर औद्योगिक अपघातांची चौकशी आणि जबाबदारी निश्चित करण्यासाठी आमदारांची विशेष समिती स्थापन करावी. लोक (कंपन्या) कारखान्यांमध्ये कामगारांचे जीव घेतात आणि मुंबई-दिल्लीसारख्या मोठ्या शहरांमध्ये जाऊन मोठे दानधर्म करतात. हा विरोधाभास थांबला पाहिजे. दालमिया असो वा इतर कोणतीही कंपनी, ते काही भरचौकात उभे राहून आपली चूक मान्य करणार नाहीत किंवा माफी मागणार नाहीत. त्यामुळे त्यांच्यावर धाक निर्माण करणारी यंत्रणा हवी.

नवाकाळ

मुंबई । शुक्रवार ६ मार्च, २०२६ • पान -८

# पश्चिम बंगालचे राज्यपाल सी.व्ही. बोस यांचा राजीनामा



**कोलकाता** - पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण तापले असताना पश्चिम बंगालचे राज्यपाल सी.व्ही. आनंद बोस यांनी आज अचानक आपल्या पदाचा राजीनामा दिला. बोस यांची १७ नोव्हेंबर २०२२ रोजी पश्चिम बंगालच्या राज्यपालपदी नियुक्ती झाली होती. बोस यांच्या राजीनाम्याचे कारण कळले नसले, तरी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्याशी त्यांचे अनेकदा मतभेद झाले होते. विद्यापीठांमधील नियुक्त्या, प्रशासकीय हस्तक्षेप आणि काही संवैधानिक मुद्यांवरून दोघांमधील वादांची चर्चा राजकीय वर्तुळात होत राहिली. बंगालमध्ये काही महिन्यात विधानसभा निवडणुका होणार आहेत. अलीकडच्या काळात वाढलेले वाद आणि राजकीय ताणतणावामुळे त्यांच्या राजीनाम्याच्या अटकळी लावल्या जात होत्या. आज त्यांनी राष्ट्रपतींना औपचारिकपणे आपला राजीनामा पाठवला.

## ज्येष्ठ माहितीपट निर्माते पटवर्धन यांना मुंबई विद्यापीठात प्रवेश नाकारला

■ मुंबई

**आंतरराष्ट्रीय** ख्यातीचे ज्येष्ठ माहितीपट निर्माते आनंद पटवर्धन यांना मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमध्ये प्रवेश करण्यास मज्जाव करण्यात आला. विद्यापीठातील पाली भाषा विभागाचे संरक्षण आणि संवर्धन व्हावे या मागणीसाठी बौध्द भिख्खू भदंत विमांसा हे गेल्या सहा महिन्यांपासून विद्यापीठात शांततापूर्ण मार्गाने सत्याग्रह करत आहेत. त्यांच्या सत्याग्रहाला पाठिंबा देण्याचा निर्णय पटवर्धन यांनी जाहीर केला आणि ते विमांसा यांची भेट घ्यायला कलिना येथे पोहोचले. मात्र विद्यापीठाने त्यांना प्रवेश नाकारला.



कलिना कॅम्पसमध्ये स्वतंत्र पाली भाषा भवनाची उभारणी करणे, अण्णाभाऊ साठे वसतीगृहाचे नूतनीकरण करण्यासाठी वाढीव निधी द्यावा आणि ३०० विद्यार्थ्यांना सामावून घेऊ शकेल असे नवीन वसतिगृह उभारावे, या भदंत विमांसा यांच्या प्रमुख मागण्या आहेत. या मागण्यांसाठी विद्यापीठ आवारात सत्याग्रह करणाऱ्या विमांसा यांची सर्व बाजूंनी कोंडी करण्याचा प्रयत्न विद्यापीठ प्रशासनाकडून होत असल्याचा आरोप होत आहे. भदंत विमांसा यांनी सांगितले की सत्याग्रह करत असताना प्रशासनाने दैनंदिन वापराच्या वस्तुदेखील मिळू नयेत अशी व्यवस्था केली आहे.

## चेंबूरच्या इमारत दुर्घटनेतील आणखी २ जखमींचा मृत्यू

■ मुंबई

**चेंबूरच्या** सुभाषनगर परिसरात बांधकाम सुरू असलेल्या इमारतीच्या सहाव्या मजल्यावरून ६ कामगार पडले होते. त्यात एका कामगाराचा मृत्यू तर पाचजण गंभीर जखमी झाले होते. या जखमींपैकी आणखी दोन कामगारांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असल्याची माहिती पालिका प्रशासनाने दिली.

सुभाषनगर येथील इमारत क्रमांक ३६ च्या सहाव्या मजल्यावरून पार्किंग लिफ्टची भिंत बांधताना सहा कामगार खाली पडले होते. या दुर्दैवी अपघातात रामनजेनेल्लू हणुमंता देशपोगु (५६) याचा मृत्यू झाला होता. तर गुणधर राय (२२), कुस रॉय (३०), रमेश रॉय (२५) विजय मौर्या (३५) संदीप रॉय (२७) हे जखमी झाले होते. आता विजय मौर्या आणि गुणधर राय या दोघांचा सायन रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला.

## गिरणगाव प्रभाग समिती निवडणूक उबाठाला धक्का! महायुतीची बाजी

■ मुंबई

**गिरणगावातील** प्रभाग समिती निवडणुकीत उबाठाला मोठा धक्का बसला आहे. एफ दक्षिण (परळ-शिवडी) आणि एफ उत्तर (परळ-शिवडी) प्रभाग समितीच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीत ऐनवेळी समाजवादी पक्षाच्या सदस्याने महायुतीच्या बाजूने मतदान केल्यामुळे उबाठाच्या उमेदवाराचा पराभव झाला.

या निवडणुकीत शिंदे गटाच्या मानसी मंगेश सातमकर यांनी उबाठाच्या श्रद्धा जाधव यांचा पराभव करत अध्यक्षपद पटकावले. या प्रभाग समितीत महायुती आणि महाविकास आघाडी यांच्याकडे समसमान मते होती. त्यामुळे समाजवादी पक्षाच्या सदस्याचे मत निर्णायक ठरले. ऐनवेळी त्यांनी महायुतीला पाठिंबा दिल्याने महायुतीची बाजी लागली. या प्रभाग समितीत भाजपाचे ५, शिंदे गटाचे ३ आणि समाजवादी पक्षाचा १ असा महायुतीकडे पाठिंबा होता. तर उबाठाचे ६, काँग्रेसचा १ आणि मनसेचा १ असा महाविकास आघाडीकडे आकडा होता. दरम्यान, इतर प्रभाग समित्यांच्या निवडणुकांमध्येही विविध निकाल लागले. सी आणि डी प्रभाग समितीत भाजपाचे आकाश पुरोहित बिनविरोध निवडून आले. ए, बी आणि ई प्रभाग समितीत काँग्रेसचे ज्ञानराज निकम यांनी भाजपाच्या रोहिदास लोखंडे यांचा पराभव केला. आर उत्तर व आर मध्य प्रभाग समितीत भाजपाचे प्रकाश दरेकर बिनविरोध विजयी झाले, तर आर दक्षिण प्रभाग समितीत भाजपाच्या लिना देहेरकर यांचीही बिनविरोध निवड झाली.

## दुबईत अडकलेल्या लाराने सांगितला शूटिंगदरम्यानच्या स्फोटाचा किस्सा

■ दुबई

**बॉलिवूड** अभिनेत्री लारा दत्ता सध्या दुबईमध्ये अडकली आहे. दुबई येथे शूटिंगदरम्यान अचानक मोठे स्फोट ऐकू आल्याने सर्वजण घाबरून बाहेर पळाल्याचा प्रसंग तिने समाजमाध्यमावर शेअर केला. हा अनुभव सांगताना तिचे डोळेही पाणावले.

लारा सध्या आपल्या मुलगी सायरासोबत दुबईत आहे. तिचे पती आणि माजी टेनिसपटू महेश भूपती कामानिमित्त दुसऱ्या ठिकाणी असल्याचे तिने सांगितले. दरम्यान मध्य पूर्वेत सुरू असलेल्या इराण-इस्त्रायल संघर्षाच्या पार्श्वभूमीवर अनेक विमानसेवा रद्द केल्याने ती आणि तिची मुलगी भारतात परतलेली नाही.

लाराने व्हिडिओमध्ये सांगितले की, २८ फेब्रुवारी रोजी ती एका स्टुडिओमध्ये शूटिंग करत होती. त्याचवेळी अचानक जोरदार स्फोटांचे आवाज येऊ लागले. आम्ही सगळे घाबरून स्टुडिओच्या बाहेर पळालो. आकाशात क्षेपणास्त्र उडताना दिसत होती. तो क्षण खूपच भीतीदायक होता. तिने पुढे सांगितले की, दुबई प्रशासनाने नागरिकांच्या सुरक्षेसाठी चांगली व्यवस्था केली आहे. आमची व्यवस्थित काळजी घेतली जात आहे.

## मिठी गाळ उपसा घोटाळा प्रकरण दुसरे पुरवणी आरोपपत्र दाखल



■ मुंबई

**सुमारे** ६५ कोटी रुपयांच्या मिठी नदी गाळ उपसा घोटाळ्याप्रकरणी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने दुसरे पुरवणी आरोपपत्र न्यायालयात दाखल केले आहे. हे पुरवणी आरोपपत्रही ७ हजार पानांचे आहे. या आरोपपत्रात महेश पुरोहित आणि सुनील उपाध्याय या दोन आरोपींची नावे आहेत. या आरोपपत्रामध्ये ३७ साक्षीदारांचे जबाब सादर करण्यात आले आहेत. दोन्ही आरोपी सध्या अटकेत आहेत.

मिठी नदीतील गाळ टाकण्यासाठी क्षेपणभूमीच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या नावे बनावट सामंजस्य करार सादर करून गाळ काढल्याचे भासवून मुंबई महापालिकेकडून पैसे उकळण्याचा आरोप या दोन आरोपींवर पोलिसांनी ठेवला आहे. उपाध्याय हा एसएनबी इन्फ्रास्ट्रक्चर प्रायव्हेट लिमिटेडचा संचालक असून, पुरोहित हा एमबी ब्रदर्स या कंपनीचा भागीदार आहे. या दोन्ही आरोपींना पोलिसांनी गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात अटक केली होती. मुंबई महानगरपालिकेच्या पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर तुंबणाऱ्या पाण्याचा निचरा करण्याची जबाबदारी असलेल्या स्टॉर्म वॉटर ड्रेनेज विभागातील काही अभियंत्यांनी या आरोपींशी संगनमत करत शेतकऱ्याच्या नावे बनावट करारनामे तयार करून मनपाकडून प्रत्यक्ष गाळ काढण्याचे काम न करता त्या कामाचा मोबदला म्हणून लाखो रुपये उकळले, असा आरोप आरोपपत्रात ठेवण्यात आला आहे.

## होर्मुज सामुद्रधुनीत क्षेपणास्त्र हल्ल्यात मुंबईच्या ३३ वर्षीय खलाशाचा मृत्यू

■ मुंबई

**होर्मुज** सामुद्रधुनीत १ मार्च रोजी 'एमटीएमकेडी व्योम' या जहाज टँकरवर झालेल्या क्षेपणास्त्र हल्ल्यात कांदिवली येथील ३३ वर्षीय दीक्षित अमृतलाल सोलंकी या खलाशाचा मृत्यू झाला. तो जहाजावर ऑईलर म्हणून कार्यरत होता. कांदिवली पश्चिमेतील महावीर नगर, एमएचबी कॉलनी येथे राहणाऱ्या सोलंकी कुटुंबीयांवर शोककळा पसरली आहे. काही आठवड्यांपूर्वी त्याच्या आईचे निधन झाले होते. तेव्हा तो मुंबईला आला होता. तिथून मूळ गावी जाऊन तो पुन्हा जहाजावर रुजू झाला होता, असे शेजाऱ्यांनी सांगितले.

सोलंकी १० डिसेंबर २०२५ रोजी टँकर जहाजावर रुजू झाला होता. ८० दिवसांपासून तो जहाजावर सेवा बजावत होता. हे जहाज ८ फेब्रुवारीला युरोपहून निघाले होते आणि सौदी अरेबियातील रास तनुरा बंदराकडे जात असताना होर्मुज सामुद्रधुनीत त्यावर हल्ला झाल्याचे सांगितले जाते. क्षेपणास्त्र स्फोटानंतर सोलंकी सुरुवातीला बेपत्ता असल्याची माहिती मिळाली होती. मात्र आता स्फोटात त्यांचा मृत्यू झाल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यांचे पार्थिव बाहेर काढण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

## म्हाडा बंगल्यासाठी प्रकाश आंबेडकर पात्र की अपात्र? २५ मार्चपर्यंत निर्णय

■ नागपूर

**वंचितचे** प्रमुख ॲड. प्रकाश आंबेडकर यांना म्हाडाच्या बंगला योजनेतील घरासाठी पात्र ठरवायचे की नाही, याबाबत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली. या याचिकेच्या सुनावणीत न्यायालयाने २५ मार्चपर्यंत अंतिम निर्णय घेण्याचे निर्देश दिले. वंचितच्या राष्ट्रीय अध्यक्षांशी संबंधित हे प्रकरण असल्याने या प्रकरणाची राजकीय व कायदेशीर वर्तुळात चर्चा सुरू आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) अंतर्गत अमरावती हौसिंग अँड एरिया डेव्हलपमेंट बोर्डाच्या उमरी-उमरखेड येथील योजनेत उच्च उत्पन्न गटातून ॲड. प्रकाश आंबेडकर यांना बंगला वाटप करण्यात आले होते. मात्र याला विनायक कात्रे यांनी याचिका करून उच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. याचिकेत म्हाडाच्या नियम ९(१ए) चा हवाला देत आंबेडकर यांना या योजनेसाठी अपात्र ठरवण्याची मागणी करण्यात आली आहे. याचिकाकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, आंबेडकर यांच्या नावावर नगरपालिका क्षेत्रात मोकळा भूखंड असल्याने त्यांना या योजनेचा लाभ घेण्याचा अधिकार नाही. दोन्ही बाजूंचे युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने तीन आठवड्यांत प्रकरण निकाली काढण्याचे निर्देश दिले. तसेच या प्रकरणात प्रतीक्षा यादीत विनायक कात्रे यांचे नाव पहिल्या क्रमांकावर असल्याने, आंबेडकर अपात्र ठरल्यास संबंधित बंगल्यावर कात्रे यांचा दावा प्राधान्याने लागू होऊ शकतो, याचाही विचार करण्यास न्यायालयाने म्हाडाला सांगितले.

## स्वेच्छेने देश सोडणाऱ्या स्थलांतरितांना ब्रिटन सरकार देणार १० हजार पौंड

■ लंडन

**ब्रिटनमध्ये** स्थलांतरित कामगारांची समस्या दिवसेंदिवस उग्र होत चालली आहे. यावर तोडगा काढण्यासाठी अनेक पर्यायांवर सरकार विचार करत आहे. त्यातील एक प्रस्ताव म्हणजे स्वेच्छेने देश सोडून जाणाऱ्या स्थलांतरितांना एकरकमी १० हजार पौंड दिले जाणार आहेत.

ब्रिटनचे गृहखाते या पर्यायावर गांभीर्याने विचार करत आहे. लवकरच प्रायोगिक तत्वावर ही योजना जाहीर केली जाण्याची शक्यता आहे. ब्रिटनच्या गृह सचिव शबाना महमूद यांनी एका वृत्तसंस्थेशी बोलताना याबाबत माहिती दिली. त्यानुसार सुरुवातीच्या टप्प्यात दीडशे स्थलांतरित कुटुंबियांसाठी ही योजना लागू केली जाईल. त्यांना माणशी १० हजार पौंड देण्यात येणार आहेत. ज्या स्थलांतरित कुटुंबांना ब्रिटनने अधिकृतपणे आश्रय दिलेला नाही अशा कुटुंबांनी सात दिवसांच्या आत देश सोडून जाण्याची तयारी दर्शविल्यास त्यांनाही मदत दिली जाईल, असे महमूद यांनी सांगितले.

## खामेनींच्या निधनावर भारताची शोकसंवेदना संघर्ष थांबवण्याचे पंतप्रधान मोदींचे आवाहन

■ नवी दिल्ली

**अमेरिका** आणि इस्त्रायलने इराणमध्ये केलेल्या हल्ल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. या संपूर्ण घटनाक्रमाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रदेशात शांततेचे आवाहन केले. मोदी म्हणाले की, कोणत्याही समस्येचा तोडगा केवळ लष्करी संघर्षातून निघू शकत नाही. संवाद आणि कूटनीती हाच कायमस्वरूपी उपाय आहे. पश्चिम आशियातील वाढता तणाव संपूर्ण जगासाठी चिंतेचा विषय असून, संघर्ष लवकरात लवकर थांबला पाहिजे, असेही त्यांनी नमूद केले.



इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या निधनानंतर भारताने अधिकृत शोकसंवेदना व्यक्त केली आहे. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी नवी दिल्लीतील इराणी दूतावासात जाऊन शोकपुस्तिकेवर स्वाक्षरी केली. यापूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही प्रदेशात शांतता आणि कूटनीतीद्वारे तोडगा काढण्याचे आवाहन केले होते. भारत सरकारतर्फे परराष्ट्र सचिव विक्रम मिस्त्री यांनी नवी दिल्लीतील इराणच्या दूतावासात भेट देऊन दिवंगत सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांना श्रद्धांजली अर्पण केली. दूतावासात ठेवलेल्या शोकपुस्तिकेत त्यांनी आपल्या संवेदना नोंदवल्या. खामेनेई यांच्या निधनाबद्दल त्यांनी तीव्र दुःख व्यक्त करत इराण सरकार आणि तेथील जनतेप्रती सहानुभूती दर्शवली.

## अभिषेक मनु सिंघवी यांना काँग्रेसकडून पुन्हा उमेदवारी

■ नवी दिल्ली

**राज्यसभा** निवडणुकीसाठी काँग्रेसने गुरुवारी ६ उमेदवारांची नावे आज जाहीर केली. तेलंगणातून अभिषेक मनु सिंघवी आणि छत्तीसगडमधून फुलो देवी नेताम यांना पुन्हा उमेदवारी दिली आहे. दोघेही विद्यमान राज्यसभा खासदार आहेत.

काँग्रेसने हरियाणातून करमवीर सिंह बौद्ध आणि हिमाचल प्रदेशातून अनुराग शर्मा यांना उमेदवारी दिली आहे. अनुराग हे कांगडा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आहेत. ते हिमाचलचे मुख्यमंत्री सुखविंदर सिंह सुक्खू यांचे निकटवर्तीय मानले जातात.

तेलंगणाच्या दुसऱ्या जागेसाठी काँग्रेसने मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांचे निकटवर्तीय मानले जाणारे वीम नरेंद्र रेड्डी यांना उमेदवारी दिली आहे. तामिळनाडूमध्ये मुख्यमंत्री स्टॅलिन यांच्या द्रमुक पक्षाने काँग्रेसला एक राज्यसभा जागा दिली आहे. तिथे काँग्रेसने एम. क्रिस्टोफर तिलक यांना उमेदवारी दिली आहे. १० राज्यांतील ३७ राज्यसभा जागांवर १६ मार्च रोजी निवडणुका होणार आहेत.

## कांद्याच्या माळा गळ्यात घालून कृषिमंत्र्यांच्या निवासस्थानी आंदोलन

■ मुंबई

**कांदा** - दुधाच्या योग्य हमीभावाच्या मागण्यांसाठी शेतकरी आक्रमक झाले. या पार्श्वभूमीवर छावा क्रांतिवीर सेनेच्यावतीने आज राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या मुंबईतील सिद्धगड ब ६ या शासकीय निवासस्थानाबाहेर आंदोलन केले. आंदोलनादरम्यान कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करत सरकारने तत्काळ निर्णय घ्या, अन्यथा कृषिमंत्र्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी केली. यावेळी आंदोलकांनी गळ्यात कांद्याच्या माळा घालून निषेध नोंदवला. आंदोलन आक्रमक होत असल्याने कृषिमंत्र्यांनी



करण गायकर यांच्यासह पाच जणांच्या शिष्टमंडळाची भेट घेतली.

आंदोलकांनी त्यांच्याकडे मागण्या केल्या की, मक्याप्रमाणे कांद्यालाही किमान आधारभूत किंमत लागू करून त्यापेक्षा कमी दराने खरेदी बंद करावी, नियम मोडणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करावी, शेतकऱ्यांचा माल शासनाने खरेदी करण्याची हमी द्यावी, शेती अवजारांवरील जीएसटी रद्द करून साहित्य स्वस्तात उपलब्ध करावे, कांद्याला राज्यस्तरीय हमीभाव जाहीर करून बाजारभाव व हमीभावातील फरक शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करावा, निर्यातबंदी हटवून साठेबाज व दलालांवर कठोर कारवाई करावी, त्याचबरोबर गायीच्या दुधाला किमान १४० रुपये व म्हशीच्या दुधाला १५० रुपये प्रति लीटर दर जाहीर करून दूध उत्पादकांना अतिरिक्त अनुदान द्यावे आणि खासगी डेअरीच्या दरकपातीवर नियंत्रण ठेवावे.

सविस्तर वाचण्यासाठी व शेअर करण्यासाठी हा क्युआर कोड स्कॅन करा

## सभागृहात सर्व ४२ मंत्री गैरहजर विधान परिषद दोनवेळा तहकूब

■ मुंबई

**अर्थसंकल्पीय** अधिवेशनादरम्यान विधान परिषदेत आज ४२ मंत्र्यांपैकी एकही मंत्री उपस्थित नसल्याने सभागृहाचे कामकाज दोन वेळा तहकूब करण्याची नामुष्की उपसभापती नीलम गोऱ्हे यांच्यावर ओढवली होती. सकाळी कामकाज सुरू होताच हा प्रकार घडल्याने विरोधकांनी मंत्र्यांना अधिवेशनाचे गांभीर्य नसल्याची टीका केली. नियमाप्रमाणे सकाळी १० वाजता विधान परिषदेचे कामकाज सुरू झाले. विरोधी बाकांवरील सदस्य विविध प्रश्नांसह सभागृहात उपस्थित होते. मात्र त्या प्रश्नांना उत्तर देण्यासाठी राज्य सरकारमधील एकही मंत्री सभागृहात हजर नव्हता. त्यामुळे प्रश्नोत्तराचा तास सुरू ठेवणे शक्य झाले नाही. मंत्री उपस्थित नसल्याने उपसभापती गोऱ्हे यांनी सुरुवातीला सभागृहाचे कामकाज १० मिनिटांसाठी स्थगित केले. त्यानंतर पुन्हा कामकाज सुरू करण्याचा प्रयत्न झाला. मात्र तरीही एकही मंत्री सभागृहात पोहोचला नाही. त्यामुळे सभागृह पुन्हा दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

## बिहारच्या राजकारणात नितीशकुमार यांचा अस्त

पान १ वरून

एनडीएला प्रचंड बहुमत मिळाले होते. ८९ जागा जिंकून भाजपा विधानसभेत सर्वात मोठा पक्ष ठरला होता. तरीही निवडणुकीपूर्वीच्या करारानुसार ८५ जागा जिंकलेल्या जदयूचे नितीशकुमार यांच्याकडे सत्तेची धुरा देण्यात आली. सत्तेची सूत्रे हाती घेतल्यानंतर अवघ्या १०५ दिवसांतच बिहारमध्ये नितीश राज संपुष्टात आले असून, बिहारमध्ये आता पहिल्यांदाच भाजपाचा मुख्यमंत्री होणार आहे. याआधी हिंदी पट्ट्यातील दुसऱ्या क्रमांकाचे राज्य असलेल्या बिहारमध्ये भाजपाला अद्याप स्वतःचा मुख्यमंत्री देता आलेला नाही. बिहार हे एकमेव हिंदी भाषिक राज्य आहे, जिथे भाजपा अजूनही स्वतःचा मुख्यमंत्री होण्याची वाट पाहत आहे. नितीशकुमार यांना राज्यसभेवर पाठवून भाजपाचा मुख्यमंत्री होणार आहे. नितीशकुमार यांचा पुत्र उपमुख्यमंत्री होणार अशी चर्चा आहे.

### तेजस्वी यादव यांचा आरोप

विरोधी पक्षनेते तेजस्वी यादव यांनी भाजपावर गंभीर आरोप केले. ते म्हणाले की, जनभावनेच्या विरोधात सत्तापरिवर्तन होत आहे. नितीशकुमार यांना हायजॅक करण्यात आले. भाजपाला जदयू संपवायचे आहे. राजदकडून अमरेंद्र धारी सिंह यांना राज्यसभा उमेदवार करण्यात आले आहे. तेजस्वी यांनी महाराष्ट्र मॉडेल बिहारमध्ये आणल्याचा आरोप केला आणि नितीश यांच्याबद्दल सहानुभूती व्यक्त केली.



आपत्कालीन काळात बिहारच्या राजकारणात अनेक चेहरे उदयास आले. लालू प्रसाद यादव, सुशील मोदी, रामविलास पासवान, शरद यादव आणि नितीशकुमार हे प्रमुख चेहरे ठरले. यांपैकी रामविलास पासवान, सुशील मोदी आणि शरद यादव यांचे निधन झाले आहे. लालू यादव निवडणूक लढवण्यास अपात्र ठरल्यानंतर सक्रिय राजकारणापासून दूर आहेत. आता या पिढीतील शेवटचा मोठा चेहरा असलेले नितीश दिल्लीला गेल्यास बिहारच्या राजकारणात एका पिढीचा जवळपास अंत होईल.

गेल्या २० वर्षांपासून आणि चार निवडणुकांपासून बिहारची सत्ता जदयूच्या नेतृत्वाखाली आहे. जर राज्यात भाजपाचा मुख्यमंत्री झाला, तर जदयू स्थापन झाल्यानंतर पहिल्यांदाच तो सहयोगी पक्ष म्हणून सत्तेत राहील. हा दुसरा प्रसंग असेल, जेव्हा जदयू सत्तेत सहभागी असेल, पण त्यांचा सर्वोच्च नेता सत्तेत नसेल. यापूर्वी २०१४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर नितीश यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला आणि त्यांच्या जागी जीतन राम मांझी मुख्यमंत्री झाले. २० मे २०१४ ते २२ फेब्रुवारी २०१५ या काळात मांझी मुख्यमंत्री होते. त्यानंतर नितीश यांनी पुन्हा सत्तेची सूत्रे हाती घेतली. त्यानंतर आजपर्यंत तेच पक्षाचा प्रमुख चेहरा आणि मुख्यमंत्री राहिले आहेत.

नितीशकुमार यांच्या निर्णयामुळे जदयू कार्यालयात तणावाचे वातावरण होते. संतप्त कार्यकर्त्यांनी एमएलसी संजय गांधी यांच्या वाहनाला घेराव घातला. काही नेत्यांवर भाजपाशी संगनमत केल्याचा आरोप करण्यात आला. २०२५ च्या निवडणुकीत आम्ही नितीश यांच्या चेहऱ्यावर मत दिले, असे कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे.नितीशकुमार यांच्या राज्यसभेवर जाण्याच्या निर्णयाविरोधात जदयू कार्यकर्त्यांनी तीव्र प्रतिक्रिया दिली आहे. सकाळपासून मुख्यमंत्री निवासाबाहेर कार्यकर्त्यांचे आंदोलन सुरू आहे. काही कार्यकर्ते तर रडत होते. नितीशकुमार बिहारचे आहेत, त्यांना कुठेही जाऊ देणार नाही. गरज पडली तर प्राण देऊ, अशी भूमिका कार्यकर्त्यांनी घेतली. मुख्यमंत्री निवासाबाहेर अनेक कार्यकर्ते भावनिक झालेले दिसले. येणाऱ्या मंत्र्यांना आणि आमदारांना परत पाठवण्यात येत असून, काही वाहनांवर रोष व्यक्त करण्यात आला.

### एनडीएच्या उमेदवारांचे अर्ज

पाटणा येथे राज्यसभा निवडणुकीच्या नामांकनाची तारीख बिहारच्या भवितव्यासाठी महत्त्वाची ठरली आहे. नितीशकुमार, नितिन नबीन यांच्यासह एनडीएचे पाचही उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले. विधानसभा परिसरात सीएम नितीशकुमार, नितिन नबीन, रामनाथ ठाकुर, उपेंद्र कुशवाहा आणि शिवेश कुमार यांनी अर्ज सादर केले. गृहमंत्री अमित शहा, उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी, विजय सिन्हा, मंत्री विजेंद्र यादव, विजय चौधरी यांच्यासह भाजप-जदयूचे अनेक वरिष्ठ नेते उपस्थित होते. नामांकनानंतर अमित शहा भाजपा आमदारांसोबत बैठकीसाठी स्टेट गेस्ट हाऊसमध्ये गेले. मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी अमित शहा यांचे शाल आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली आणि त्यांनी एकत्र विधानसभा गाठली.